दैनिक
# जय महाभारत
POSTEL NO.L/RNP/172/RENEWAL/2023-25
संपादक : विजयकुमार वाव्हळ
www.dainikmahabharat.com RNI No. MAHMAR/2015/64418 jaymahabharat2015@gmail.com
महाराष्ट्र • बीड (महाराष्ट्र) • दैनिक • मराठी | वर्ष ११ वे | • अंक ४४ • सोमवार दि.२९ सप्टेंबर २०२५ • किंमत २ रू. • | पाने ४
छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक

## यहाँ के हम सिकंदर! पाकिस्तानला लोळवत
## भारताने पटकावले आशिया कपचे जेतेपद

दुबई: शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या आशिया कपच्या सामन्यात भारताने पाकिस्तानविरुद्ध बाजी मारली. तिलक वर्माच्या शानदार खेळीच्या जोरावर भारताने आशिया कप उंचावला आहे. आशिया कपमध्ये भारताने तिसऱ्यांदा पाकिस्तानला हरवले. तिलक वर्मा या विजयाचा हिरो ठरला. भारताने पाकिस्तानचे आव्हान १९.४ षटकांत पूर्ण केले. भारताने नवव्यांदा आशिया कपचा खिताब जिंकला.

पाकिस्तानचे १४७ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या भारताची सुरूवात खराब झाली. दुसऱ्याच षटकांत त्यांना पहिला धक्का बसला तो अभिषेक शर्माच्या रूपात. संपूर्ण आशिया कपमध्ये जबरदस्त कामगिरी करणाऱ्या अभिषेकला या सामन्यात केवळ ५ धावा करता आल्या. त्यानंतर लगेचच सूर्यकुमार यादव अवघ्या १ धावेवर बाद झाला. त्यानंतर शुभमन गिललाही जास्त काळ खेळपट्टीवर टिकता आले नाही. त्याने १२ धावा केल्या आणि तो बाद झाला. त्यानंतर संजू सॅमसन आणि तिलक वर्माने खेळी सावरण्याचा प्रयत्न केला. भारताचा डाव सावरलेला असतानाच संजू सॅमसन २४ धावांवर बाद झाला. त्यानंतर तिलक वर्मा आणि शिवम दुबेने खेळी सावरली. एकीकडे तिलक वर्माने आपले अर्धशतक पूर्ण केले. तिलक वर्माच्या शानदार नाबाद ६९ धावांच्या खेळीच्या जोरावर भारताने पाकिस्तानचे आव्हान १९.४ षटकांत पूर्ण केले



आशिया कपच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानने भारतासमोर १४७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि फिरकी गोलंदाज कुलदीप यादवच्या गोलंदाजीमुळे पाकिस्तानचा संघ १९.१ षटकांत १४६ धावांवर ऑलआऊट झाला. पाकिस्तानकडून सलामीवीर साहिबजादा फरहानने सर्वाधिक ५७ धावा केल्या. तर भारताकडून कुलदीप यादवने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

वरुण चक्रवर्तीने साहिबजादा फरहानला बाद करून भारताला पहिली विकेट मिळवून दिली. साहिबजादा आणि फखर जमान यांनी पाकिस्तानला पहिल्या विकेटसाठी ८४ धावांची भागीदारी करून चांगली सुरुवात करून दिली होती. पण वरुणने साहिबजादाला बाद करून ही भागीदारी मोडली. ज्यामुळे भारताला सुटकेचा निश्वास सोडला. साहिबज़ादाने ३८ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांसह ५७ धावा केल्या. कुलदीप यादवने साईम अयुबला बाद करून पाकिस्तानला दुसरा धक्का दिला. कुलदीप यादवच्या गोलंदाजीवर बुमराहने त्याचा कॅच पकडला. अयुब ११ चेंडूत १४ धावा करून बाद झाला. ज्यामध्ये दोन चौकारांचा समावेश होता. पाकिस्तानची तिसरी विकेट अक्षर पटेलने घेतली. भारतासाठी चौथी विकेट वरुण चक्रवर्तीने घेतली. फखर चांगली फलंदाजी करत होता आणि अर्धशतक झळकावण्याच्या जवळ होता. पण वरुणने त्याला कुलदीपकडे कॅच द्यायला भाग पाडलं. फखर ३५ चेंडूत ४६ धावा करून बाद झाला.

हुसेन तलतला बाद करून अक्षर पटेलने पाकिस्तानची पाचवा विकेट घेतली. पाकिस्तानने चांगली सुरुवात केली होती. पण भारतीय गोलंदाजांनी जोरदार पुनरागमन केले आणि पाकिस्तानला अडचणीत आणले.कर्णधार सलमान आघाला बाद करून कुलदीप यादवने पाकिस्तानची सहावा विकेट घेतली. सलमान ७ चेंडूत आठ धावा करून बाद झाला.कुलदीप यादवने शानदार गोलंदाजी केली आणि पाकिस्तानला सातवा धक्का दिला. शाहीन आफ्रिदी खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. कुलदीपची ही सामन्यातील तिसरी विकेट होती. फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने शानदार कामगिरी करत पाकिस्तानला आठवा धक्का दिला.

## पवार कुटुंबाने पोसलेल्या गुंडांनी हल्ला केला...!

### लक्ष्मण हाके यांचा आरोप , पवार कुटुंबाला पुन्हा केले लक्ष्य

पुणे /प्रतिनिधी

ओबीसी आरक्षणासाठी लढा देणारे आंदोलक लक्ष्मण हाके यांच्या वाहनावर काल (शनिवारी, ता २७) अज्ञात तरुणांनी हल्ला केल्याची घटना समोर आली होती. ही घटना अहिल्यानगर जिल्ह्याच्या पाथर्डी तालुक्यातील आरनगाव बाह्यवळण रस्त्यालगत घडली होती. काल सकाळी लक्ष्मण हाके हे दैत्य नांदूर (ता. पाथर्डी) येथे आयोजित ओबीसी एल्गार सभेसाठी जात होते. प्रवासादरम्यान त्यांनी अहिल्यानगरजवळ नाश्ता करण्यासाठी थांबले. नाश्ता करून पुन्हा प्रवास सुरू करत असतानाच आरनगाव बाह्यवळण रस्त्यावर काही अज्ञात तरुणांनी त्यांच्या गाडीला अडवून अचानक काठ्यांनी हल्ला केला, या हल्ल्यात त्यांच्या वाहनाचे मोठे नुकसान झाले असून, काचा फोडण्यात आल्या आहेत. सुदैवाने हाके यांना शारीरिक इजा झाली नाही,या हल्ल्याबाबत एबीपी माझाशी बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, माझ्यावर हल्ला करणारा जो दळवी आणि त्याचे सहकारी आहेत यांचे फोटो आता समोर आले आहेत आणि यांचे फोटो शरदचंद्र पवार आणि निलेश लंके यांच्यासोबत देखील आहेत, या सर्व लोकांनी माझ्यावर जाणीवपूर्वक हल्ला केला आहे, असं हाके म्हणाले.

हाके म्हणाले, माझी आणि या माणसांची काही वैयक्तिक दुश्मनी नाही, पण पवार कुटुंबाने असे गुंडे पोसलेले आहेत. आज त्याच गुंडानी माझ्यावर हल्ला केला. माझ्यावर आजपर्यंत ८ ते ९ हल्ले झाले आहेत, त्यांच्यावर कारवाई होत नाही. हल्लेखोरांवर कारवाई झाली असती तर मला आज संरक्षण द्यायची सुद्धा



गरज पडली नसती. पोलिसांचा संरक्षण असताना देखील काल माझ्यावर हल्ला झाला, या लोकांना वर्दीची भीती नसावी, यांना माहिति आहे की हल्ला केल्यावर काहीच होत नाही, अजून अनेकांवर हल्ला करतील. हे आता सांगत आहेत की अंतर्गत विवाहाबद्दल बोललो म्हणून माझ्यावर हल्ला केला, या लोकांना कल्पना नाही की छत्रपती शाहू महाराजांनी शंभर पेक्षा अधिक आंतरजातीय विवाह लावून दिले होते, यांना शाहू महाराज कळायला यांच्या पुढच्या शंभर पिढ्या जातील, असंही पुढे लक्ष्मण हाकेंनी म्हटलं आहे. महाराष्ट्र ओरबाडून खाण्याचे काम या मंडळींनी केलं आहे. पाहुण्या रावळ्यांचं राज्य या लोकांनी महाराष्ट्रावर आणलं, सहकारी संस्था यांच्या नावावर केल्या. महाराष्ट्र राज्यातला ५० ते ६०% ओबीसी समाज हा मुख्य प्रवाहाच्या बाहेर आहे, हा समाज आजही सामाजिक न्यायाच्या प्रतीक्षेत आहे, असंही पुढे लक्ष्मण हाके म्हणाले.

दरम्यान, हाके यांनी नुकतीच फेसबुक पोस्ट करत आपले शत्रू वाढत असल्याचे नमूद केले होते. त्यानंतर अवघ्या एका दिवसात झालेल्या या हल्ल्याने खळबळ उडाली आहे. हाके यांनी सांगितले की, हल्ल्यात १० ते १२ जण सहभागी होते. पोलिसांच्या दोन गाड्या सोबत असूनही हल्लेखोरांनी दोन ते तीन फुटांचे बांबू घेऊन आमच्यावर बेछूट प्रहार केला. दहा सेकंद उशीर झाला असता तर बांबू थेट आमच्या डोक्यात बसले असते, असे ते म्हणाले. या हल्ल्यात त्यांच्या एका सहकाऱ्याचे हात-पाय फ्रॅक्चर झाले आहेत.

## राज्य शासनाचा गरिबांचा आनंदाचा शिधा थांबला; सणाचा आनंद हिरावला

### गोरगरिबांच्या आनंदात विरजण, दसरा-दिवाळीच्या तोंडावर लाभार्थ्यांमध्ये नाराजी

किल्लेधारूर (मोमीन इर्शाद)

सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून राज्य सरकारतर्फे गरिबांना दिलासा देण्यासाठी आनंदाचा शिधा योजना सुरू करण्यात आली होती. यात गहू, तांदूळ डाळ, साखर, तेल, रवा, मैदा आधी साहित्याचा समावेश असलेला आनंदाचा शिधा दिवाळी, दसरा, गुढीपाडवा, गौरी गणपती यासारख्या सणामध्ये लाभार्थ्यांना शंभर रुपयात पुरवण्यात येत होता. मात्र गेल्या वर्षभरापासून या योजनेला अचानक ब्रेक लागला आहे.धारूर तालुक्यातील १२० स्वस्त धान्य दुकानामार्फत सर्व लाभार्थ्यांना हा आनंदाचा सुद्धा पोहच करण्यात येत होता. पूर्वी मिळणाऱ्या संपूर्ण किटमध्ये डाळ साखर पामतेल, रवा मैदा आणि तूरदाळ यांचा समावेश होता. परंतु मे २०२४ पासून ही योजना पूर्णपणे बंद करण्यात आली असून आता केवळ गहू आणि तांदळाचा पुरवठा केला जात आहे यामुळे गोरगरिबांनी आता सण उत्सव कसा साजरी करायचा असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा टाकला आहे. महागाईने डोके वर काढले असताना बाजारातून डाळ साखर तेल विकत घेणे गरीब कुटुंबाच्या आवाक्याबाहेर गेले आहे त्यामुळे अनेक कुटुंबावर संकट कोसळले आहे. गहू आणि तांदूळ मिळतात पण आमचं पोट फक्त त्यावर कसं




भरायचं सरकारने फक्त निवडणुकीमध्ये मते मिळत मिळावीत यासाठीची योजना सुरू केली होती का? असा सवाल लाभार्थी उपस्थित करीत आहेत. दसरा दिवाळी सारखे मोठे सण समोर आले असताना आनंदाचा शिधा मिळत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.आनंदाचा शिधा का बंद झाला- महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०१९ पासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात आनंदाचा शिदा ही योजना राबवण्यात आली होती या योजनेमुळे गोरगरिबांना दोन घास आनंदाचे मिळत होते परंतु शासनाने स्वतःच्या फायद्यासाठी विविध योजना सुरू केल्यामुळे या योजनेकडे कानाडोळा झाल्याचे बोलले जात आहे.अनेक लाभार्थी धारूर तहसील कार्यालयात मारत आहेत चकरा गोरगरीब अनेक लाभार्थी धारूर तहसील कार्यालयात आनंदाचा अशी शिधा कधी भेटणार यासाठी चकरा मारत आहेत. परंतु शासनाकडून ठोस उपाय नसल्याने व तो आणखी तालुक्यात आला नसल्यामुळे अधिकारीही हतबल झाले असून याबाबत आम्हाला कुठली माहिती नसल्याचे सांगत आहेत परंतु गोरगरीब मात्र आनंदाचा शिधाकडे आशा लावून बसला आहे.

## गेवराई ते गोंदी बससेवा सुरू करण्याची मागणी

### प्रवाशांची मागणी ; रस्ता दुरूस्ती पूर्ण झाल्याचे पत्र

गेवराई (जिल्हा प्रतिनिधी शेख जावेद सर) गेवराई बस स्थानक वरून गेवराई ते गोंदी जाणाऱ्या एसटी बस वाहतुकीस कोणताही अडथळा होणार नाही, रस्ता वाहतुकीस योग्य आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आगार व्यवस्थापकांना कळवूनही या मार्गावरील बस बंद केल्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ही बससेवा सुरू करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.कोणतीही कल्पना न देताच बंद केली. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. बांधकाम विभागाने रस्ता वाहतुकीस योग्य असल्याचे पत्र गेवराई बस स्थानक आगाराला दिले आहे. तात्काळ प्रवाशांची




गैरसोय लक्षात घेता बससेवा सुरू करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. तसे केले नाही तर रस्त्यावर उतरू, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

ग्रामीण भागात तसन्तास खाजगी गाड्यांची प्रतीक्षा करावी लागत आहे. मात्र वेळेवर बस नसल्याने नाईलाजाने इतर खाजगी वाहनांद्वारे जास्त पैसे देऊन प्रवास करावा लागतोय अद्यापही गेवराई तालुक्यातील गेवराई ते गोंदी यासारख्या ग्रामीण भागात बससेवा नियमित सुरू झाली नाही. नववी ते बारावीपर्यंत विद्यालये सुरु आहेत. या मार्गावरील एस.टी. बसेस सुरू करणे गरजेचे झाले आहे.

## माजलगाव धरणातून ११गेटद्वारे ११३९२४.७४ क्युसेसने पाण्याचा विसर्ग

माजलगाव (प्रतिनिधी) मागील काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील सर्व लहान-मोठे तलाव तुडुंब भरली असून,त्यातील पाण्याचा प्रवाह माजलगाव धरणात वेगाने येत असल्याने माजलगाव धरण तुडुंब भरले आहे.त्यामुळे धरणाचे टप्प्या टप्प्याने ११ दरवाजे उघडले आहेत.या दरवाजातून ११३९२४.७४ क्युसेसने सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडण्यात आले आहे.



तर या धरणातून मोठ्याप्रमाणात तालुक्यात अतिवृष्टीने छोटीमोठी धरण तर भरलीच आहेत.पण शेताला छोट्या तळ्याचे स्वरूप आले आहे.धरणाचे पाणी पाहण्यासाठी बघ्याची तोबा गर्दी होत आहे. त्यामुळे तहसीलदार संतोष रुईकर व पोलीस प्रशासन यांना हटवाण्यासाठी प्रयत्न करत आहेत.


माजलगाव धरण कार्यक्षेत्रातील सिंदफणा नदीसह कुंडलिका नदी,तसेच बिंदुसरा ही धरणे तुडुंब भरली आहेत.त्यातील पाण्याचा प्रवाह मोठ्याप्रमाणात चालु आहे.त्यामुळे माजलगाव धरणाचे पाणी नदीपात्रात सोडण्याचे प्रमाण जादा होऊ शकते.त्यामुळे प्रशासनाने माजलगाव,मनूर,लुखेगाव, गोविंदपूर,सांडस चिंचोली, देपेगाव,नागडगाव,रोशनपुरी या नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

## गुटक्यावर दोन ठिकाणी छापे, दीड लाखाचा ऐवज जप्त

बीड /प्रतिनिधी

गुटखा विक्रीवर कडक कारवाई करण्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी दिलेले निर्देश अंमलात आणत आज सकाळी दोन ठिकाणी छापे टाकण्यात आले.

गुप्त माहितीच्या आधारे थिगळे गल्लीतील किराणा दुकानात विक्री करणारा अशोक गणेश लाल लोहिया व राज गल्ली बीड येथील किराणा दुकानात विक्री करणारा सय्यद लतीफ सय्यद शहा मोहम्मद



यांच्याकडून गुटखा जप्त करण्यात आला.एम एच २३ - ४६९८ क्रमांकाची रिक्षा व गुटखा मिळून एकूण दीड लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.तपासात उघडकीस आले की हा गुटखा गेवराई येथील एका व्यक्तीकडून पुरवठा केला जात होता.शहरातील गुटखा विक्री पूर्णपणे बंद व्हावी यासाठी बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व टपरी चालकांना बोलावून गुटखा न विकण्याची सूचना देण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हनपुडे पाटील, पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. बाबा राठोड, पोलीस अमलदार संजय राठोड, सुशेन उगले, मंगेश शिंदे आदींनी केली आहे.

## संपादकीय

# महाराष्ट्रात महाप्रलय

महाराष्ट्रावर महाप्रलयाचं संकट आलं आहे. नेहमीपेक्षा थोडा लवकरच सुरू झालेला पाऊस नवरात्रीतही आषाढासारखा कोसळतो आहे. अहिल्यानगरच्या दक्षिण भागापासून मराठवाड्याला कवेत घेत या पावसाने अर्ध्या विदर्भालाही अक्षरशः झोडपून काढलं आहे. सोलापूर आणि जळगाव जिल्ह्याचा काही भागही या पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. जेमतेम पर्जन्यमानाच्या या प्रदेशाला कोकणापेक्षा अधिक मुसळधार पाऊस सोसणं कठीण आहे. पावसाच्या दीर्घकाळ आणि काही ठिकाणी ढगफुटीसारख्या कोसळण्याने या भागातील जनजीवन पूर्ण उद्ध्वस्त झालं आहे. विशेषतः शेतीचं झालेलं नुकसान अपरिमित आहे. महाराष्ट्राला मे महिन्यापासून पावसाचे चातकापेक्षाही जास्त वेध लागतात. अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागते. टँकरने होणारा पाणीपुरवठाही अपुरा पडू लागतो. माणसांना स्वतःच्या गरजा आणि पाळीव जनावरांच्या पाण्याच्या गरजा कशा भागवायच्या असा प्रश्न सतावत असतो. त्यामुळे, एकदा पाऊस सुरू झाला, की निम्मा महाराष्ट्र सुटकेचा निःश्वास टाकत असतो. राज्याचा त्यापेक्षा अधिक भाग पावसाने धरणं भरावी, तळी-विहिरी भराव्यात एवढीच माफक अपेक्षा ठेवून असतो. यावर्षी अनेक ठिकाणी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच पाणी चांगलं भरलं. जलाशय तुडुंब झाल्याने ग्रामीण भागात समाधान पसरलं. लोक उत्साहात होते. पण, ऑगस्टच्या शेवटापासून पावसाने आणखी जोर धरला तेव्हाच निम्म्या महाराष्ट्राचे धाबे दणाणले. नंतरच्या पावसाने शेतीचं, फळबागांचं नुकसान सुरू केलं. मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात याच काळात ढगफुटीसदृश पाऊस झाला.

परतीचा पाऊस जाता जाता दोन-चार ठिकाणी तडाखा देत असतोच. तसा इतिहास आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीला झालेलं नुकसान तिथेच थांबेल, अशी अटकळ होती. पण, प्रत्यक्षात पावसाचा जोर आणखी वाढला. सप्टेंबरचा दुसरा पंधरवडा उलटूनही पावसाचा जोर कमी होत नाही, हे लक्षात आलं, तेव्हाच जाणकारांना या वर्षीच्या महाराष्ट्रावरच्या संकटाची चाहूल लागली. अहिल्यानगरच्या दक्षिण भागातल्या दुष्काळी पट्ट्यातही असा पाऊस झाला, की गावंच्या गावं पुराने वेढली गेली. चारचाकी गाड्या वाहून जातील, एवढ्या वेगाने पाण्याचे प्रवाह ऐन गावांतून वाहत होते. गेल्या दोन दिवसांत पावसाचा हाच जोर सर्वदूर पसरला आहे. महाराष्ट्राचे अनेक जिल्हे आणि त्यातील अनेक तालुके अक्षरशः पाण्यात बुडाले आहेत.

महाराष्ट्रात यापूर्वीही पूर आले, महापूर आले. पण, अनेक जिल्ह्यांत एकाचवेळी रबरी बोटी आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने ग्रामस्थांची, नागरिकांची सुटका करण्याची वेळ आली नव्हती. ती यावेळी आली आहे. या महाप्रलयाला 'महा' का म्हटलं, ते यावरून लक्षात येईल. या पावसाळ्यात हिमालयात अनेक ठिकाणी ढगफुटी झाल्या. पर्वताचे मोठे भाग ढासळले. गावंच्या गावं वाहून गेली. पंजाबातही ३० जणांचा बळी घेऊन पावसाने आपला रुद्रावतार दाखवला. पण, महाराष्ट्रात पठारी भागात पावसाने सातत्याने आपलं तांडव चालवलं असल्याने या भागातल्या उभ्या पिकांचं, फळबागांचं, शेतजमिनींचं, गाईगुरांचं आणि लोकांच्या निवाऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पावसाने गावंच्या गावं साफ केली आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारला मोठी मदत करावी लागणार आहे. सुदैवाने या संकटाची चाहूल आधीच लागली असल्याने सरकारची यंत्रणाही बऱ्यापैकी तयारीत आहे. मंत्रिमंडळाच्या कालच्या बैठकीत त्यामुळे परिस्थितीचा आढावा घेऊन मदतीची प्राथमिक घोषणा झाली, ती दिलासादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्तांना दिलेला दिलासाही खूपच आश्वासक ठरला आहे.

# डिजिटल बँकिंगकडे वाटचाल - द्वारकादास मंत्री बँकेच्या सभेत अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांची घोषणा

## डॉ.आदित्य सारडा यांच्या प्रयत्नांतून द्वारकादास मंत्री बँक सक्षम

बीड : ( प्रतिनिधी )

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेचा उठ-ठ ९ टक्के असल्यास बँक सक्षम असल्याचे मानले जाते मात्र द्वारकादास मंत्री बँकेचा उठ-ठ हा ६६.१५ टक्के आहे. बँकेचे नेट वर्थ हे कमीत कमी २ कोटी पाहिजे परंतु बँकेचे नेटवर्थ हे २४ कोटीच्या वर असल्यामुळे बँक आर्थिक दृष्ट्या सक्षम असून लवकरच ग्राहकांना डिजिटल बँकिंग सुविधा देण्यासाठी बँकेकडून कार्यवाही सुरू असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांनी दिली. व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची ६३ वी वार्षिक सर्व साधारण रविवार २८ सप्टेंबर रोजी बीड शहरातील बालाजी मंदिर सभागृहामध्ये संपन्न झाली. यावेळी डॉ. आदित्य सारडा बोलत होते.

सभेला उपाध्यक्ष शुभम चितलांगे, सि.ए.गिरीश गिल्डा, डॉ.आदिती सारडा, अंजली पाटील, डॉ.राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख मोहम्मद सलीम, प्रल्हाद वाघ, सुधाकर वैष्णव, राम गायकवाड, सतीश धारकर प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन शफियोद्दिन, माजी मुख्यकार्यकारी अधिकारी राधेश्याम सोनी, बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, कठीण काळात बँकेच्या कर्मचारी व संचालक मंडळानी बँकेची धुरा नीट चालवल्यामुळे बँक रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक निर्बंधातून पूर्णतः मुक्त झाली. रिझर्व्ह बँकेचे सर्व आर्थिक नियम बँकेने पाळलेले. या सर्व गोष्टीचा परिपाक म्हणून चालू आहवाल वर्षात ऑडीटरने बँकेस ऑडीट वर्ग 'अ' दिलेला आहे. वर्षाअखेर बँकेचे वसूल भाग भांडवल २० कोटीच्या वर असुन बँकेचा एकूण निधी ९२ कोटीच्या वर आहे. त्यामध्ये बँकेचा राखीव निधी १५ कोटी २८ लाख, बुडीत व संशयित निधी ५३ कोटी ५५ लाख, ईमारत निधी २ कोटी ७१ लाख, गुंतवणूक चढउतार निधी १७ लाखाच्या वर बँकेकडे उपलब्ध आहे. बँकेच्या एकूण ठेवी ६३ कोटी च्या वर असून एकूण कर्जे ७९ कोटी ८२ लाख आहे. बँकेची ईतर बँकेतील शिल्लक, रोख शिल्लक व शासकीय रोख्यातील व ईतर बँकेतील गुंतवणूक ८१ कोटी २४ लाख असून त्यामध्ये शासकीय रोख्यातील गुंतवणूक ६० कोटी ११ लाख आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे शासकीय रोख्यामध्ये छऊढड च्या १८ टक्के गुंतवणूक करावी लागते परंतु बँकेनी केलेली गुंतवणूक ही ९४ टक्के पेक्षा जास्त आहे. यातून ही बँकेची आर्थिक स्थिती किती सक्षम आहे हे सिद्ध होते. बँकेचे निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ०.४२ असून बँकेच्या २० शाखा कार्यरत आहेत. वसुलीचे उत्कृष्ट उदिष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्याचा बक्षीस देऊन गोरव करण्यात आला. सुत्रसंचलन राधेश्याम सोनी यांनी तर आभार संचालक संतोष लहाने यांनी मानले.



**भक्कम आर्थिक सामर्थ्य असलेले मंत्री बँक**

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे ९ टक्के उठ-ठ असला तरी द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेचा उठ-ठ तब्बल ६६.१५ टक्के इतका आहे. तसेच नेटवर्थ किमान २ कोटींचे असणे अपेक्षितअसताना बँकेचे नेटवर्थ तब्बल २४ कोटींच्या वर आहे. मार्च २०२५ पर्यंत काटेकोर वसुलीमुळे बँकेचा नेट छझ- शून्य टक्के झाला असून ऑडिट अहवालात बँकेस 'अ' वर्ग प्रदान करण्यात आला आहे. या बद्दल अध्यक्ष डॉ. आदित्य सारडा यांनी सर्व संचालकांचे अभिनंदन केले.

**मंत्री बँकेला गुंतवणूक आणि ठेवींची मजबुती**

वर्षाअखेर बँकेचे एकूण निधी ९२ कोटींच्या वर असून त्यात राखीव निधी १५.२८ कोटी, बुडीत व संशयित निधी ५३.५५ कोटी, तर इमारत निधी २.७१ कोटी इतका आहे. बँकेच्या एकूण ठेवी ६३ कोटींच्या वर असून कर्जवाटप ७९.८२ कोटी इतके आहे. याशिवाय इतर बँकांमधील शिल्लक व शासकीय रोख्यातील गुंतवणूक ८१.२४ कोटी आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार छऊढड पैकी १८% गुंतवणूक करणे बंधनकारक असताना द्वारकादास मंत्री बँकेने तब्बल ९४ टक्के गुंतवणूक शासकीय रोख्यात केली आहे. त्यामुळे मंत्री बँकेला गुंतवणूक आणि ठेवींची मजबुती मिळाली आहे.

**मंत्री बँकेच्या या आहेत महत्वाच्या योजना**

बुलेट सोने तारण कर्ज योजना, सुलभ पगार तारण कर्ज योजना, छोट्या व मध्यम व्यवसायासाठी कर्ज पुरवठा, वाहतूक कर्ज, बांधकाम कर्ज व व्यापारी कर्ज अशा विविध योजनेमार्फत कर्ज वाटप करण्यात येत आहे याच बरोबर, ग्राहकांसाठी लवकरच डिजिटल बँकिंग सुविधा उपलब्ध होणारा आहे. या शिवाय अन्य काही मह्वाच्या योजना मंत्री बँक ग्राहकांना उपलब्ध करून देत आहे.

# राजमोहन बजाज यांचा जागतिक यशाचा सोहळा

### एस. पी. जैन कॉलेज, सिडनी येथून मास्टर्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स पदवी व गोल्ड मेडल

माजलगाव : अमर साळवे

( दै. महाभारत ) गावातील युवा प्रतिभा राजमोहन गुलाबचंद्र बजाज याने आंतरराष्ट्रीय शिक्षण क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. पुण्यातील डी.वाय. पाटील कॉलेजमधून बी.ई. (कंप्युटर सायन्स) पदवी पूर्ण केल्यानंतर, फक्त महाराष्ट्रातील निवडक चार विद्यार्थ्यांपैकी एक म्हणून त्याची एस. पी. जैन कॉलेज, सिडनी येथे मास्टर्स ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स या प्रतिष्ठित कोर्ससाठी निवड झाली होती.

दिनांक २५ सप्टेंबर रोजी झालेल्या समारंभात राजमोहन याला गोल्ड मेडल मिळाले. निकाल हाती येताच, एका मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपनीकडून त्याला तात्काळ ऑस्ट्रेलियातच नोकरीची ऑफर देण्यात आली.



कृत्रिम बुद्धिमत्ता हा आधुनिक संगणक विज्ञानातील सर्वात महत्त्वाचा आणि भविष्य बदलणारा विषय असून, राजमोहन याच्या या यशामुळे माजलगाव तालुक्याचा मान उंचावला आहे.

ही आनंदवार्ता मिळताच माजलगावात श्री सतीशबाप्पा सोळंके, आशिष घाडगे, सतीश राजवन, प्रतापराव रांजवण, शिवाजीभाऊ रांजवण, दिनकर होके, प्रमोद आबा तोर, पांडुरंग काशीद, प्रेम शेठ मांनदणे, वामनराव डक तसेच बजाज परिवार व मित्रपरिवार यांनी मोठ्या उत्साहात पेढे वाटून आनंद साजरा केला.या प्रसंगी श्याम देशमुख, गोविंद चांडक आदी मान्यवर उपस्थित होते.

# भालगाव ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश



केज . प्रतिनिधी

खासदार बजरंग सोनवणे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन भालगाव (ता. केज) येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.पक्षाच्या विचारसरणीवर श्रद्धा, जनतेचा विश्वास आणि विकासाची दिशा यांवर विश्वास ठेवून झालेल्या या प्रवेशामुळे पक्ष संघटन अधिक बळकट झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.या प्रवेशामुळे केज तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ताकद अधिक वाढली असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पक्ष प्रवेश कार्यकर्त्यांची नावे- अब्दुल सिराज तांबोळी, भगवान शिवचंद्र गिरी, शिवहार गुरलिंग विभुते, लायक बाशुमियाँ शेख, जब्बार बालुमियाँ शेख,तय्यब बशीर पठाण, कलिम तासौदिन शेख हकिम तासोदिन शेख, मसुद इस्माईल शेख, मिया ननौमियाँ शेख, हरीभाऊ शिवचंद गिरी, सुनिल लक्ष्मण सिरसाठ ,मयूर उत्तमराव सुरवसे, महादेव बळीराम मोरे आदि उपस्थित होते.

# तेली समाज दांडिया महोत्सवात आदर्श शिक्षक चंद्रशेखर फुटके यांच्या हस्ते सपत्नीक आरती संपन्न

परळी : विकास वाघमारे ( दै.महाभारत )

येथील तेली समाजाच्या वतीने दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून शनिवारी (दि.२७) जिल्हा परिषदेचे आदर्श शिक्षक चंद्रशेखर फुटके व प्राचार्या सुजाता फुटके यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी महिला भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

येथील वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात तेली समाजाच्या वतीने तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या दांडिया महोत्सवात जिल्हा परिषदेचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त, युट्यूब टिचर चंद्रशेखर फुटके व स्कॉलर केजी स्कूलच्या प्राचार्या सुजाता फुटके यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. यावेळी तेली समाज सार्वजनिक दांडिया उत्सव समितीच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना चंद्रशेखर फुटके म्हणाले की, महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे ते कार्य गेल्या चार वर्षांपासून दांडिया महोत्सवाचे आयोजक युवानेते पवन फुटके व दांडिया उत्सव समिती करत आहे. यामध्ये दांडिया बरोबरच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्याने दांडियाचा उद्देश पूर्ण होत आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रांतीक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, छगन आप्पा क्षीरसागर, तुळशीदास सालमोटे, ओम सोनटक्के, प्रा मधुकर शिंदे, मलिकार्जुन साखरे, नागनाथ आप्पा भाग्यवंत, शिवशंकर जठार, विनोद आळणे तेली समाज दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष युवक नेते पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, राजकुमार भाग्यवंत,



सचिन लासे, सतिष फुटके, राहूल क्षीरसागर, सुनील क्षीरसागर, दिपक साखरे, ईश्वर राऊत, रवी अन्नपुर्णे, शंकर कौले, ईश्वर जठार, ऋषी फकिरे, ओमकार नाईक, प्रदीप पिंपळे, प्रसाद जठार उपस्थित होते.

# प्रा. टी. पी. मुंडे यांच्याकडून बिडगर कुटुंबीयांचे सांत्वन

परळी : विकास वाघमारे (दै.महाभारत)

ज्येष्ठ नेते दिलीपराव आबा बिडगर यांचे बंधू आत्माराम संभाजी बिडगर (वय ६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. या दुःखद प्रसंगानंतर ओबीसी नेते प्रा. टी. पी. मुंडे यांनी दाऊतपूर येथील त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन बिडगर कुटुंबीयांचे सांत्वन केले.



प्रा. मुंडे यांनी शोकाकुल कुटुंबीयांशी संवाद साधून दुःखाच्या प्रसंगात धैर्य सोडू नये तसेच या कठीण प्रसंगात आम्ही त्यांच्या दुःखात सहभागी आहोत. ईश्वर कुटुंबीयांना दुःखाचा हा डोंगर पेलण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.आत्माराम बिडगर गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्या निधनाने कुटुंबावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, भावंडे असा मोठा परिवार आहे.या वेळी श्री. विनायक गडदे यांच्यासह गावातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रद्धांजली अर्पण करून आत्म्यास सद्गती लाभो, अशी प्रार्थना केली.




# खुलताबाद तालुक्यात अतिवृष्टीने हाहाकार : शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

## ओला दुष्काळ जाहीर करण्याची आमदार प्रशांत बंब यांची मागणी

खुलताबाद : बाबासाहेब दांडगे (दै. महाभारत)

शनिवारी रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे खुलताबाद तालुक्यात नदी, नाले, ओढे दुथडी भरून वाहू लागले. लगतच्या शेतात पाणी शिरल्याने सर्वत्र पाणीच पाणी झाले असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांनी गदाना, गोळेगाव, वेरूळ, तळ्याचीवाडी, पळसगाव आदी गावांना भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांना धीर देत त्यांनी संबंधित यंत्रणेला तात्काळ आपत्कालीन मदत उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. तसेच तालुक्यात उद्भवलेली पूरस्थिती लक्षात घेऊन ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी आमदार बंब यांनी केली.

शनिवारी रात्री ढगफुटी सदृश्य पावसामुळे फुलमस्ता नदीने धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे गदाना, गोळेगाव, घोडेगाव, भडजी, विरमगाव, देवळाणा, सुलतानपूर परिसरातील तब्बल एक हजार हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले. मंजुळाबाई संख, हरी संख, रामकृष्ण संख, सुभाष संख, शेकनाथ अधाने यांसह अनेक शेतकऱ्यांच्या घरात पूरपाणी घुसले. त्यामुळे घरातील अन्नधान्य भिजले तर शेतातील सोयाबीन, मका, भुईमूग व कपाशी पिके वाहून गेली. पळसगाव शिवारातील काही शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनीचे चार एकर क्षेत्रच वाहून जाऊन शेताला नदीचे स्वरूप प्राप्त झाले.



आमदार बंब यांनी गदाना येथील पाळीचा मळा तसेच वेरूळ, तळ्याचीवाडी येथील केळीबाग, सोयाबीन व मक्याच्या शेतांना भेट देऊन शेतकऱ्यांना धीर दिला. पळसगाव येथील ज्ञानेश्वर तायडे यांच्या ढगफुटीने वाहून गेलेल्या तीन एकर क्षेत्राची पाहणी करून संबंधित तहसीलदार, कृषी अधिकारी व मंडळाधिकारी यांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले.

यावेळी शेतकऱ्यांना धीर देताना आमदार बंब म्हणाले, लवकरच शासनस्तरावर पाठपुरावा करून शेतकऱ्यांना मदत मिळवून देऊ. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी विविध पथके स्थापन केली असून त्यांच्या संपर्क क्रमांक सर्व ग्रुपवर प्रसिद्ध करण्यात येतील. नागरिकांनी मदतीसाठी त्वरित संपर्क साधावा.

या पाहणीवेळी तहसीलदार स्वरूप कंकाळ, गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, कृषी अधिकारी तारगे, भाजप तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, जिल्हा सरचिटणीस विकास कापसे, माजी सभापती भिमराव खंडागळे, माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, शहराध्यक्ष परसराम बारगळ, माजी उपसभापती दिनेश आंभोरे यांच्यासह गावातील सरपंच, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# कोल्हापूर शिरोली स्मॅकचा सुवर्णमहोत्सवी सोहळा व ५० वी वार्षिक सभा यशस्वीरीत्या संपन्न

कोल्हापूर/प्रकाश कांबरे
(दै. महाभारत)

कोल्हापूर : शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन स्मॅक च्या सुवर्णमहोत्सवी वार्षिक सोहळ्याला उत्साहपूर्ण वातावरणात हॉटेल पॅव्हेलियनमध्ये काल संपन्न झाली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून दास ऑफशोअर प्रायव्हेट लिमिटेडचे चेअरमन व एमडी, उद्योजक डॉ. अशोक डी. खाडे उपस्थित होते.

आपल्या प्रभावी मुलाखतीत त्यांनी स्मॅक आयटीआयमधून पासआऊट होणाऱ्या वेल्डर व इलेक्ट्रिशन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. वेल्डिंग आणि इलेक्ट्रिकल क्षेत्रात आमच्या उद्योग समूहात विद्यार्थ्यांना संधी देऊ तसेच भविष्यात आणखी कोणत्या संधी निर्माण करता येतील, यासाठी आपण एकत्र बसून चर्चा करू, असे ते म्हणाले.

स्मॅक बरोबर सहकार्य करण्यास त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला व आपल्या उद्योग समूहाला भेट देण्याचे आमंत्रण दिले.कोल्हापूरच्या उद्योगपतींच्या कामगिरीबद्दल डॉ. खाडे यांनी कौतुक व्यक्त करताना ते म्हणाले, इथल्या लोकांत चिकाटी, रग आणि रांगडेपणा आहे. एवढं काही इतरत्र दिसत नाही. त्यामुळे तुमच्याकडे पाहून मला अभिमान वाटतो. त्याचवेळी त्यांनी खंत व्यक्त करताना सांगितले की, जर मी २०-२५ वर्षांपूर्वी कोल्हापूरला आलो असतो, तर आज आपण आणखी मोठी औद्योगिक स्वप्नपूर्ती साधू शकलो असतो. तरीही आता बी पेरण्याचा प्रयत्न करू, ज्याचे फळ पुढील काळात मिळेल.

सांगली, कोल्हापूर आणि सातारा या जिल्ह्यांत प्रचंड औद्योगिक क्षमता असून हे तीन जिल्हे जोडले गेले तर पश्चिम महाराष्ट्राला औद्योगिक विकासाची नवी दिशा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. शासनाच्या मदतीने आणि एकत्रित प्रयत्नांनी या प्रदेशाचा औद्योगिक चेहरा बदलू शकतो, असे ते म्हणाले.

सोहळ्याची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. या वेळी प्रमुख पाहुणे डॉ. खाडे यांच्यासह चेअरमन राजू पाटील, चेअरमन भरत जाधव, ऑ. सेक्रेटरी शेखर कुसाळे आणि खजानिस बदाम पाटील उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक चेअरमन राजू पाटील यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक अतुल पाटील यांनी करून दिला.

या प्रसंगी डॉ. खाडे यांचा अनोख्या पद्धतीने सन्मान करण्यात आला. त्यांच्या आईची खास तयार केलेली मूर्ती आणि त्यांच्यासह आईचे पोस्टल स्टॅम्प भेट देण्यात आले. या भावनिक क्षणी संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.या सोहळ्यातील विशेष आकर्षण ठरलेले राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या मूर्तीचे अनावरण डॉ. खाडे यांच्या हस्ते करण्यात आले. शाहू महाराजांच्या औद्योगिक योगदानाला अभिवादन म्हणून सभासदांना खास स्मृतिचिन्ह भेट देण्यात आले. या आधुनिक स्मृतिचिन्हात शाहू महाराज मागे हात बांधून समोर पाहताना दाखवले आहेत. सेमी-रियलिस्टिक मॉर्डन आर्ट प्रकारातील या कलाकृतीत औद्योगिक क्षेत्रातील भूमितीक रचना व प्रगतीचे प्रतीकात्मक घटक समाविष्ट करण्यात आले आहेत. या स्मृतिचिन्हाचा पहिला मानाचा स्वीकार प्रेसिटिकचे पहिले सदस्य महेश मधुकर सोवनी यांनी केला. हे स्मृतिचिन्ह सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सर्व सभासदांना भेट म्हणून दिले जाणार आहे.

कार्यक्रमात डॉ. खाडे यांची प्रत्यक्ष मुलाखत आय. ए. पाटील व देशपांडे यांनी घेतली. उद्योगक्षेत्र, रोजगाराच्या संधी, सहकार्य आणि प्रादेशिक औद्योगिक विकास या विषयांवर त्यांनी प्रेरणादायी विचार मांडले. त्यांच्या स्पष्ट, दूरदृष्टी दाखवणाऱ्या आणि प्रेरणादायी वक्तव्यांनी सभासद, पदाधिकारी व उपस्थित सदस्य भारावून गेले.

या सोहळ्यात स्मॅकचे पदाधिकारी, संचालक, स्वीकृत संचालक, निमंत्रित सदस्य तसेच विविध उद्योग संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित हा सोहळा स्मॅकच्या औद्योगिक इतिहासातील एक संस्मरणीय पर्व ठरला आणि कोल्हापूरच्या उद्योगविश्वाला नवी दिशा देणारा ठरला.तत्पूर्वी स्मॅक ची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच यशस्वीरीत्या पार पडली. सभेला सभासद उद्योजक उपस्थित होते.सभेची सुरुवात श्रध्दांजली देऊन करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांचे स्वागत, प्रास्ताविक व मनोगत स्मॅक चे चेअरमन राजू पाटील यांनी केले.

सभेत स्मॅक आयटीआयचा वार्षिक अहवाल प्रशांत शेळके, अध्यक्ष यांनी सादर केला, तर स्मॅक क्लस्टरचा अहवाल सुरेश चौगुले, अध्यक्ष यांनी मांडला. मागील सभेच्या प्रोसीडिंग्ज वाचनाचे काम मॅनेजर यांनी पार पाडले.सभेतील आभार प्रदर्शन भरत जाधव, व्हाईस चेअरमन यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीत गायन करून करण्यात आला, ज्यामुळे सभेचा औपचारिक आणि उत्साही शेवट झाला.

# छत्रपती शिवाजी विद्यालयाचे जलतरण स्पर्धेत यश



माजलगाव : अमर साळवे

( दै. महाभारत ) क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे.

१०० मीटर बॅक स्ट्रोक या जलतरण प्रकारात ओमकार पठाडे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला तर ५० मीटर बटरफ्लाय या जलतरण प्रकारात ऋषिकेश हिंगण याने तृतीय क्रमांक मिळवला. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक माधव घोलप यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, सतीश दुगड, ईनायत खान पठाण, दयानंद तोष्णीवाल, डॉ . योगिता होके पाटील, अभय होके पाटील, मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, बालासाहेब झोडगे, आप्पासाहेब होके, माधव घोलप, विष्णू गडकर, मुरलीधर भालशंकर, अनंत शेजुळ, सय्यद गयास, अनंत राठोड, दत्तात्रय इंगळे, मिलिंद देशपांडे, तुळशीराम साळवे, पंकज कळसकर, शेख शहाणूर, ज्ञानेश्वर पवार, फरजाना पठाण, सत्यप्रिया होके पाटील, शिल्पा शिनगारे , स्मिता डाके, दत्ता पांडे दिनकर काळे यांनी अभिनंदन केले आहे.

# गिरडा घाटात पावसामुळे डोंगरावरील दगड आले रोडवर



सावळदबारा :( प्रतिनिधी )

दिनांक २७ सप्टेंबर रोजी सावळदबारा परिसरात पाऊस झाला आहेत सावळदबारा पासून जवळ असलेला गिरडा घाट मधील पाऊस झाल्याने मोठमोठाले दगड रोडवर च्या आजूबाजूला रस्त्यावर आल्याने जोरदार पाऊस झाला तर त्या पावसामुळे हेच दगडं एखाद्या वाहनावर येऊ शकतात त्यामुळे या रोडवरील आजूबाजूला आलेले दगड संबंधित विभागाने तात्काळ काढण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व वाहन चालक करीत आहेत

सावळदबारा पासून काही अंतरावर असलेल्या गिरडा घाट या रस्त्यावरून सावळदबारा परिसरातील ग्रामस्थांना दररोज याचं घाटामधून प्रवास करावा लागतो या ठिकाणी बुलढाणा जाण्यासाठी या घाटामधून रस्ता आहे परंतु बाजूला मोठमोठ्या व लहान दगड आले आहेत जर जोरदार पाऊस झाला तर कधीही रोडच्या बाजूला असलेले दगड कधीही रोडवर येऊ शकतात त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहेत गिरडा घाटामधून रोडच्या बाजूला मोठी खोल दरी आहे हा घाट रोडच्या कडेला आलेल्या मोठमोठे दगड बाजूला करण्यात यावे रात्री सुमारास वाहनधारकांना अडचण निर्माण होत आहेत या डोंगरातून आलेल्या पाणी थेट रस्त्यावर आल्याने लहान मोठे हे दगड रोडवर आले आहेत सावळदबारा परिसरातील ग्रामस्थांना बुलढाणा जाण्यासाठी याचं घाटामधून ये जा करावी लागते गिरडा घाट रोडच्या कडेला मोठी दरी आहेत दगड रोडवर आले आहेत रात्रीच्या सुमारास या ठिकाणी ये जा करण्यासाठी वाहनधारकांना कसरत करावी लागत आहेत संबंधित विभागाने तात्काळ लक्ष देऊन गिरडा घाट मधील रोडच्या बाजूला आलेल्या दगड काढण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व वाहन चालक करित आहेत

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोल पंपाचे उद्घाटन संपन्न




माजलगाव : अमर साळवे

( दै. महाभारत ) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीची उप बाजारपेठ असलेल्या दिंद्रुड येथे बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोल पंपाचे उद्घाटन आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी साडेअकरा वाजता संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुरावजी पोटभरे हे तर प्रमुख पाहुणे राजाभाऊ मुंडे,संभाजीराव शिंदे,शेषराव जगताप,चेअरमन विरेंद्र सोळंके ,रवींद्र सोळके ,महादेव तोंडे,अच्युतराव लाटे, संभाजी शेजुळ,बजरंग साबळे ,संतोषराव यादव नवनाथ धाईजे,भीमराव टाकणखार अजय कोमटवार,अजय जाधव, शेख अखिल भाई,नानासाहेब ठोंबरे, सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक सभापती जयदत्त नरवडे यांनी केले. उद्घाटन पर भाषणात आमदार सोळंके म्हणाले की, शेतकऱ्यांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा बाजार समितीचा उपक्रम असुन दिंद्रुड येथे उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या हिंदुस्थान पेट्रोलियम पंपाचे साध्या पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. हा पंप दिंद्रुड-आडस मार्गावर उभारण्यात आलेला असून, परिसरातील नागरिकांसाठी याचा निश्चित फायदा होईल. माजलगाव बाजार समितीचा आणखी विस्तार करण्यासाठी कृषी विभागाकडून जमीन मिळावी, यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जात असुन लवकरच ही जमीन हस्तांतरित होईल. तसेच माजलगाव, वडवणी आणि धारूर या तिन्ही बाजार समिती सुस्थितीत असल्यामुळे, शेतकऱ्यांसाठी अधिक सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. दिंद्रुड येथे शेड निर्मित करून आडत दुकाने सुरू करण्याचे नियोजन आहे आणि लवकरच हे कामही मार्गी लागेल अशी अपेक्षा व्यक्त करत पेट्रोल पंप उद्घाटनास शुभेच्छा दिल्या तर अध्यक्षीय समारोपात बाबुराव पोटभरे यांनी सभापती नरवडे व उपसभापती मोरे यांच्या नेतृत्वात बाजार समिती चांगले काम करत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन कनिष्ठ लिपिक सिद्धेश्वर येवले यांनी केले तर आभार संचालक कॉ. दत्ता डाके यांनी मानले. कार्यक्रमास संचालक आसारामजी घायतिडक आबाजी भोसले ,उद्धवराव नाईकनवरे,संजयजी कचरे अमोल जाधव,प्रभाकरराव होके,जुगलकिशोर नावंदर सचिव हरिभाऊ सवणे,अधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

### शेतकऱ्याच्या ट्रॅक्टर मध्ये मोफत डिझेल टाकून पंपाचा शुभारंभ

माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने नेहमीच शेतकरी हित जोपासले जाते. बाजार समितीच्या वतीने पेट्रोल पंप उद्घाटनाला देखील संगम येथील शेतकरी पद्माकर मुंडे यांच्या ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. २३ ६८६९ मध्ये एक हजार रुपयांचे मोफत डिझेल टाकून पेट्रोल पंपाचा शुभारंभ करण्यात आला.

# भंडारा शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक संपन्न



भंगरा: मुकेश कुमार
( दैं. महाभारत )


आज व्ही.के. हॉटेल, गांधी चौक भंडारा येथे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक खासदार श्री प्रफुल पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी भंडारा शहरातील जनतेच्या अडचणी, स्थानिक प्रश्न व विकासकामांबाबत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील पक्ष संघटन अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने व विजय मिळवून देणारे उमेदवार उभे करण्याच्या दृष्टीने संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. खासदार श्री. प्रफुल पटेल यांनी आपल्या मार्गदर्शन करतांना आगामी निवडणुकांमध्ये एकजुटीने काम करून पक्षाला यश मिळवून देण्यासाठी संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले. पक्षाच्या धोरणांबरोबरच स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देऊन काम केल्यास जनता आपल्याला पाठिंबा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बैठकीला खासदार श्री प्रफुल पटेल यांच्या सोबत सर्वश्री नानाभाऊ पंचबुद्धे, धनंजय दलाल, सुनील फुंडे, विनय मोहन पशिने,महेंद्र गडकरी, परवेज पटेल, यशवंत सोनकुसरे, रवींद्र वानखेडे, नरेंद्र झंझाड, सरिता मदनकर, हेमंत महाकाळकर, मंजुषा बुरडे, राजू हेडाऊ, विजू खेडीकर, जगदीश निंबार्ते, रुपेश खंगले, संजय बोदरे, शेखर गभने, आशिष दलाल, प्रशांत देशकर, रजनीश बन्सोड, नागेश भगत, अशोक सांडेकर, आरजू मेश्राम, लोकेश नागरे, हितेश सेलोकर, सुनील साखरकर, नेहा शेंडे, अमिश वासनिक, अमान मेश्राम, लक्ष्मीकांत गभने, प्रभाकर बोदेले, रत्नमाला चेटुले, नरेश इल्मकर, राजू पटेल, सोनू खोब्रागडे, महेंद्र वाहणे, राहून निर्वाण, उमेश ठाकरे, अमर उजवणे, संजय वरगंटीवार, प्रदीप सतदेवे, मनोहर गणवीर, किरि गणवीर , अनिता महाजन, गणेश चौधरी, श्रेष्ठ मेहर, प्रतीक थानथराते, इंदू येरकडे, नारायणसिंग राजपूत, अरुण अंबादे, राहून वाघमारे, जुगल भोंगाडे, अंबादास मंदुरकर, विवेक मेश्राम, जवाहर निर्वाण, सोनू कनोजे, संजय सतदेवे, बल्लीभाई सहित मोठ्या संख्येने पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

बैठकी दरम्यान खासदार श्री प्रफुल पटेलजी यांच्या विकासवादी धोरणांवर व खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून भंडारा येथील सर्वश्री अरुण भेदे, जगदीश उके, दिवाकर बोरकर, एकनाथ लांजेवार, नंदलाल लाहौरिया, सुजीत बोरकर, योगेश बोरकर, विनोद वघारे, जितेंद्र श्रीपात्रे, अनिकेत बोरकर, दिनेश आगरे, ऋचा आगरे, प्रकाश मानपुरे, गणेश येरने, नितिन शेन्द्रे, पंकज लिमये, दिनेश भूते, देवराम गिरिपुंजे, रमेश कुम्भलकर, सुनील निनावे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये श्री प्रफुल जी पटेल त्यांच्या हस्ते पक्षाचा दुपट्टा वापरून प्रवेश केला

# पुरातन कालीन वेसीची दुरावस्था ; वेस पडण्याच्या मार्गावर

## वेळोवेळी मागणी करूनही दुरुस्तीकडे दुर्लक्ष



तलवाडा : (प्रतिनिधी )

गेवराई तालुक्यातील तलवाडा याठिकाणी तलवाडा-गंगावडी रोड लगत गावच्या पूर्वेस मुख्य रस्त्यावर दगडीचिऱ्या मध्ये बांधकाम केलेली पुरातन वेस आहे ती वेस गावच्या वैभवात भर पाडणारी आहे परंतु त्याकडे कोणीच लक्ष देत नसल्याने तिची अवस्था फार जीर्ण झाली आहे,पावसाच्या पाण्याने माती वाहून गेल्याने काही ठिकाणचे दगड निसटले आहेत तर काही खाली पडल्याने त्या पुरातन कालीन वेसिची दुरावस्था झाली आहे,सदर वेसीचे बांधकाम करावे यासाठी वेळोवेळी प्रशासनास सांगितले परंतु याकडे संबधित प्रशासन दुर्लक्ष करत असून येत आहे,तिचे बांधकाम झाले तर ती वेस गावच्या वैभवात नक्कीच भर टाकेल अशी भावना गवतील व गल्लीतील नागरिक व्यक्त करत आहेत.

पूर्वीच्या काळात अनेक गावे ही कोणत्या ना कोणत्या वास्तू अथवा शिल्प कलेच्या नावावर प्रसिद्ध होती अनेक गावात आजही या वस्तू उभ्या आहेत परंतु त्याकडे स्थानिक प्रशासन व संबधित विभाग लक्ष देत नसल्याने त्या मोडकळीस आल्या आहेत तर काही गावच्या वास्तू व शिल्प नामशेष झाल्याचे चित्र आहे,काही ठिकाणी शिवकालीन वास्तू आजही आपली ओळख जपत आहेत तर काही नामशेष झाल्या आहेत परंतु आजही अनेक ठिकाणी पुरातन वास्तू उभ्या आहेत त्यांची अवस्था बिकड झाली असून त्या दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत,तलवाडा याठिकाणी ही गावच्या पुर्वेस मुख्य रस्त्यावर पोलीस स्टेशन च्या बाजूस एक पुरातन वेस आसुन ती मोडकळीस आल्याने कधीही पडू शकते ही शक्यता नाकारता येत नाही सतत होणाऱ्या पावसामुळे वेशीच्या दगडाची माती वाहून गेली असून दगड मोकळे झाले आहेत ते कधीही पडू शकतात ,त्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने दलीत वस्ती निधी मधून त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी वेळोवेळी केली होती. परंतु अद्याप याकडे कोणीच लक्ष दिले नसल्याने आता वेस मोडकळीस आली आहे.याच वेसितून पोळा सणा दिवशी बैल पूजन करून गावात मिरवणुकी साठी नेतात ती मुख्य वेस मोडकळीस आली असून भविष्यात ती अचानक पडली तर नुकसान होण्याची भीती नाकारता येत नसून त्या वेशीची दुरुस्ती लवकरात लवकर करावी अशी मागणी होत आहे.

# सरपंचाने पुढाकार घेतल्याने पूल व रस्ता वाहून जाण्या पासून वाचवला

## मी जनतेचा सेवक आहे:- सरपंच अंबादास सांगळे

चकलांबा : ( प्रतिनिधी )

चकलंबा परिसरात मागच्या आठवड्यात अतिदृष्टी मुळे सर्व तलाव शंभर टक्के भरले आहे. त्यात पुन्हा शुक्रवार व शनिवार त्या प्रमाणात मुसळधार पाऊस झाल्यामुळे चकलांबा गावचा अंबा तलाव आणि चोपण तलाव ओव्हरफुल झाल्यामुळे त्यामध्ये लाईटच्या तारा तुटल्या पोल पडले आता पूर व रस्ताही वाहून जाऊ लागला होता. सरपंचाला माहीत होतास त्यांनी लगेच तांड्यावरची टीम बोलून थोडासाही वेळ वाया न घालता पुढाकार घेऊन त्या रस्त्यावरील येणाऱ्या जाणाऱ्या साठी अडचण निर्माण होऊ देता तात्काळ काम सुरू केले. तलावाच्या साड्याचा पाण्याने हा पूल वाहून जाण्याच्या मार्गावर होता

हा रस्ता तांड्याला आणि चकलंबा येथील बऱ्याच लोकांची शेती आहे. या रस्त्यावर बाळानाईक तांडा सरपंच अंबादास सांगळे, ग्रामपंचायत सदस्य महादेव गाढे, राजेंद्र रामभाऊ सांगळे,युवा नेते विष्णू सुधाकर खेडकर, युवा नेते अविनाश सांगळे,सुभाष चव्हाण, नामदेव बाबुराव सांगळे काळुनाईक तांडा आदी तचेच सरपंचाच्या टीमचे मनापासून आभार मानले जात आहे. सरपंच म्हणाले मी जनतेचा सेवक आहे कधीही मी तुमच्यासाठी तत्पर हजर आहे. सरपंचाने कोणतीही सरकारची मदत व पंचनाम्याची वाट न बघता आपल्या खिशातून मदत करणारे बालानाईक तांड्याचे सरपंच अंबादास भाऊ सांगळे यांचे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.



# शिवना नदीच्या पुराने मत्स्य व्यवसाय व शेतीचे मोठे नुकसान

खुलताबाद: बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

कन्नड तालुक्यातील शिवना-टाकळी मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणाच्या पाच दरवाज्यांतून तब्बल ४५ हजार क्युसेक्स पाणी शिवना नदी पात्रात सोडण्यात आले. त्यामुळे शिवना नदीला आलेल्या पुरामुळे नदीकाठच्या शेतीसोबतच मत्स्य व्यवसायालाही मोठा फटका बसला.

या पुरात शेतीचे तसेच मत्स्य व्यवसायाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून मोठ्या प्रमाणात जमीन व मासे वाहून गेले आहेत. धरणातून पाणी सोडण्याचे योग्य नियोजन न झाल्याने हा गंभीर प्रकार घडल्याचा आरोप शेतकरी व नुकसानग्रस्तांनी केला आहे.

गतवेळी पुरामुळे कोल्हापुरी बंधारा फुटून नुकसान झाले होते. मात्र यावेळी दुप्पट नुकसान झाल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. नुकसानीबाबत प्रशासनाला वारंवार कळवूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, आजी-माजी आमदार, तालुक्यातील लोकप्रतिनिधी तसेच महसूल, कृषी, जलसंपदा व मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी यांनी या भागाला भेट देऊन पाहणी केली.



# शेतकऱ्यांचे नको नको ते नुकसान - आरे वरुन राज्या, आता तरी बास कर!

## शेतकऱ्यांचा हंबरडा ; होत्याचं नव्हतं झालं
## पुरात पिके गेली ; आणि जमीनही गेली.!

पत्रकार : दत्ता कराड
( दै. महाभारत )

आरे वरून राज्या, आता तरी बास कर,किती आंत पाहतो या शेतकऱ्यांचा!पीके गेली, जनावरे गेली, शेतीही गेली,शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील पाणी वाहू लागले,जीव कोरडा पडला, माती निघून गेली,ये वरून राज्या, आणखी काय मागणार रे .! या काही ओळी नाहीत, तर शेतकऱ्यांच्या जिव्हारी लागणाऱ्या वेदनांचा हुंकार आहे. आज शेतकऱ्याचं आयुष्य इतकं हलाखीचं झालंय की तो रडतोय... पण त्याच्या आसवांना न्याय विचारणारा कोणी नाही. सततची निसर्गाची अवकृपा, शासनाचा वेळोवेळी होणारा विलंब, व कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी अक्षरशः संपत चाललाय.एखाद्या आईने ९ महिने पोटात जीव वाढवावा आणि जन्माला येण्याआधीच तो हरवावा, तसं आज शेतकऱ्यांचं झालं आहे. कापूस, सोयाबीन, बाजरी, टोमॅटो ,ऊस,अशी अनेक पिकं अवकाळी पावसामुळे वाहून गेली. एक नव्हे तर तीन तीन वेळा पेरण्या केल्या तरी यश नाही. कधी वादळ, कधी गारपीट, कधी अतिवृष्टी निसर्ग जणू रागावल्यासारखा वागतोय.शेतीसोबत जनावरं ही शेतकऱ्याची कमाई आणि भावनिक जोड असते. मात्र या संकटात शेकडो जनावरं मरण पावली. चारा सडला, गोठे वाहून गेले, औषधं मिळाली नाहीत. ज्यांच्या शेणावर घर चालत होतं, त्या गुरांची राख उरली. शेतकऱ्याचा केवळ आर्थिक नाही, तर मानसिक आधारही हरपला.अतिवृष्टीमुळे नुसती पिकं नाही तर जमिनीची वरची सुपीक माती वाहून गेली आहे. शेतातील मातीच निघून गेली, हे शेतकऱ्यांसाठी फार मोठं नुकसान आहे. जिथे पुन्हा शेती करणं



शक्यच नाही, अशा अवस्थेत काही ठिकाणी शेतकऱ्यांनी जमीनच सोडून दिली आहे.सांत्वनाला कुणीही नाही. शेतकरी जेव्हा आपल्या मेहनतीनंतरही रिकाम्या हाताने घरी परततो, तेव्हा त्याच्या डोळ्यांतून फक्त अश्रू वाहतात. सरकारचे अधिकारी पंचनामे करत नाहीत, आणि बँका वसुलीसाठी दारात उभ्या राहतात.अनेक शेतकरी बँकेचे कर्ज, खासगी सावकाराचे पैसे, बी-बियाण्यांचे उधारी, सर्व काही गमावतात. आत्महत्येचा विचार करावा इतकी अवस्था होते. घर चालवायचं कसं? मुलांना शिकवायचं कसं? पुढच्या हंगामात काय पेरायचं - हा प्रश्न आ वासून उभा.दरवेळी मदतीचं आश्वासन दिलं जातं, पण प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या हातात काहीच राहत नाही. नुकसान भरपाई येईपर्यंत खूप वेळ जातो. कोणत्याही विमा योजनेचा लाभ वेळेवर मिळत नाही. कागदपत्र, तपासणी, मान्यता, साक्षरतेचा अडसर हे सर्व शेतकऱ्याला तोडून टाकतात.

सरकार माय बाप शेतकऱ्याच्या वेदना ऐका...

आजच्या घडीला शेतकऱ्याला फक्त मदतीची गरज नाही, तर समजून घेण्याची, वेळेवर साथ देण्याची गरज आहे. तो फक्त आपल्या देशाचा अन्नदाता नाही, तर आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे.आरे वरून राज्या, आता तरी बास कर... ही फक्त हाक नाही, ही एक जगण्याची भीक आहे.शेतकऱ्याच्या अश्रूंना जर आपण आता उत्तर दिलं नाही, तर उद्या आपल्याही ताटात भात नसेल.



## दुष्काळातून सावरण्याचे बळ दे
### स्वरूपाताई रोहित पंडित यांचे त्वरित देवीला साकडे

गेवराई : ( प्रतिनिधी ) गेवराई विधानसभा मतदारसंघात गेल्या दहा दिवसापासून जोरदार मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीने शेतकऱ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. यातून सावरण्यासाठी बळीराजाला बळ दे असे साकडे तलवाडा येथील त्वरिता देवीला सौ स्वरूपाताई रोहित पंडित घातले आहे.गेवराई तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाल्याने आणि मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकाचे नुकसान झाले आहे अनेकांचे घर आणि संसार उपयोगी साहित्य वाहून गेले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक कणा मोडला आहे. या परिस्थितीतून त्यांना सावरण्यासाठी आणि खंबीरपणे उभा राहण्यासाठी बळ मिळावे. यासाठी सौ स्वरूपाताई रोहित पंडित यांनी दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी तलवाडा येथील त्वरिता देवीला १९१ दुर्गा सप्तशती पाठ करून प्रार्थना करत साकडे घातले आहे. याप्रसंगी युवानेते रोहित भैया पंडित आणि सौ स्वरूपाताई पंडित यांनी देवीची आरती केली. यावेळी त्यांच्या समवेत गेवराई तालुक्यातील माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## सुजातदादा आंबेडकर यांच्या आज होणाऱ्या एल्गार सभेस हजारोंच्या संख्येने
## उपस्थित रहा – अविनाश वाव्हळे

परळी : विकास वाघमारे
(दै.महाभारत)

वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजातदादा आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली परळी वैजनाथ येथे २९ सप्टेंबर २०२५ रोजी भव्य एल्गार महासभा आयोजित करण्यात आली असून, या ऐतिहासिक सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा अविनाश वाव्हळे यांनी केले आहे

ही महासभा श्रद्धा मंगल कार्यालय, परळी येथे दुपारी ३





वाजता पार पडणार आहे. या सभेच्या माध्यमातून वंचित, बहुजन, शोषित, पीडित समाजाच्या हक्कासाठी आवाज बुलंद केला जाणार असून, नव्या सामाजिक आणि राजकीय चळवळीला चालना देण्याचा उद्देश आहे.

विशेष आकर्षण

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रसिद्ध जनकवी व शाहीर शीतल साठे यांचा नवयान महाजलसा होणार असून, सामाजिक जाणीव जागवणाऱ्या गीतांनी वातावरण भारले जाणार आहे

सर्व नागरिकांना आवाहन

परळी तालुक्यातील सर्व हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अविनाश वाव्हळे यांनी केले आहे

# ओला दुष्काळ जाहीर करा



### नुकसानीचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजार भरपाई दया :-- युवा नेते विठ्ठल बारगजे


चकलंबा : (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील अनेक महसूल मंडळात वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिदृष्टी मुळे खरीपात तील पिकाचे मोठे नुकसान झाले आहे दरम्यान शुक्रवारी व शनिवारी रात्री झालेल्याअतिदृष्टी मुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे तरी शासनाने वला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपयाची मदत द्यावी अशी मागणी युवा नेते विठ्ठल बारगजे यांनी केली आहे ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री राज्याचे अर्थमंत्री आहात त्या जिल्ह्यावर असा दुजाभाव का बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी दादा तुमच्या पासून खूप मोठी अपेक्षा केली होती मग दादांनी बीड जिल्ह्यावर सावतार व्यवहार का मुसळधार पाऊस झाल्याने पिकाचे मोठे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळआर्थिक मदत ची गरज आहे शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी अशी मागणी युवा नेते विठ्ठल बारगजे यांनी केली अतिवृष्टी मुळे खरीप हंगामातील कांदा, सोयाबीन, मूग, अक्षरश नेस्तनाबूत झाले आहे. सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, तूर पीक पाण्याखाली गेले आहे काही शेतकऱ्यांचे सोयाबीन, उडीद पीक हाती येऊन गेले अशी परिस्थिती झाली आहे यासह फळबागांना देखील मोठ्या प्रमाणात हानी पोहोचले आहे शुक्रवारी, शनिवारी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच फळबागांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या संपूर्ण शेतकऱ्यांच्या पिकाचे सरसकट पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी व सरसकट व वला दुष्काळ जाहीर करा अशी मागणी युवा नेते विठ्ठल बारगजे यांनी केली आहे

## आष्टीच्या खासबागेत २० वर्षापासून होतोय नवरात्र उत्सव साजरा

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी शहरातील खासबाग येथील स्व. बाळासाहेब धोंडे यांच्या पत्नी श्रीमती मैनाबाई धोंडे यांच्या नवसपूर्तीनिमित्त राशीन येथील यमाई देवीचे उपस्थान २० वर्षापुर्वी १० लाख रु. खर्चुन त्यांच्या तीन मुलांनी हे देवीचे मंदीर बांधले आहे.

दोन गुंठे जमीनीवर हे देवस्थान बांधले आहे. बाजार भावाने या जागेची लाखो रु. किंमत होते. गोकुळ बाळासाहेब धोंडे, साईनाथ बाळासाहेब धोंडे आणि दिपक बाळासाहेब धोंडे हे तीन भाऊ एकत्र कुटुंब पध्दतीने राहतात. आपल्या आईची भक्ती व श्रध्दा पुर्ण करण्यासाठी व नवसाच्या यमाई देवी मंदीर या



बांधवांने १६ वर्षांपूर्वी खासबाग परिसरात स्वताःच्या मालकीच्या जागेत हे मंदीर बांधले आहे. येथे गेली २० वर्षापासुन नवरात्र उत्सवात विद्युत रोशनाई, आराधी मेळा आयोजित केला जात आहे. येथील देवी मंदिरातील नवरात्रोत्सव कार्यक्रम अनेक वर्षापासुन सुरु आहेत. दरवर्षी या पवित्र भूमीत अध्यात्मिक क्षेत्रातील आराधीगीत आदी कार्यक्रमाने भाविक भक्तांना समाधान मिळते.

यंदाही येथे आरधीगीतांचा कार्यक्रम व ईतर सेवा संपन्न होत आहेत. आष्टी शहरातील विविध भागातील भाविक भक्त येथे उपस्थित राहतात आणि हजारों देवी भक्त दर्शनास येतात. या नवरात्र उत्सवाची मोठी उत्सुकता भक्तांमध्ये निर्माण झाली आहे. या नवरात्र उत्सवा निमित्त होणाऱ्या सर्व कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन देवीचे भक्त गोकुळ धोंडे यांनी केले आहे.

## विकसित भारत २०४७ संकल्पना साकार करण्यासाठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता -प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख

अंबड/प्रतिनिधी

विकसित भारत २०४७ ही भारत सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी संकल्पना असून ती साकार करण्यासाठी सर्व स्तरावर अगदी एका व्यक्तीपासून ते कुटुंब,खेडी शहरे, तालुका,जिल्हा,राज्य, राष्ट्र इत्यादी स्तरावर नियोजन करून त्या नुसार देशाच्या विकासा कडे वाटचाल करण्या साठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष डॉ.आबासाहेब देशमुख यांनी केले.महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण मंत्री व माजी आरोग्य मंत्री आणि मत्स्योदरी शिक्षण संस्था,जालना चे अध्यक्ष श्री.राजेश टोपे यांच्या मार्गदर्शना खाली कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबड व व्ही.आर.दाडगे लायब्ररी फाउंडेशन, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत २०४७ या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय अधिवेशन अंबड येथे नुकतेच संपन्न झाले.दि.१५ ऑगस्ट २०४७ रोजी साजरा करण्यात येणाऱ्या भारतीय स्वातंत्र्याच्या १०० व्या वर्धापन दिना चेऔचित्य साधून भारत देशाला एक विकसित राष्ट्र बनविण्यासाठी विकसित भारत २०४७ ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना भारत सरकारने मांडली आहे. या योजनेअंतर्गत देशाची आर्थिक उन्नती, आधुनिक तंत्रज्ञान विकास,युवा,गरीब, महिला व शेतकरी या चार घटकांच्या सक्षमी करणावर विशेष भर देण्यात येणार आहे. सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण,आरोग्य सुविधा, प्रगत तंत्रज्ञान,भौतिक सुधारणा,सामाजिक विकास,समृद्ध अर्थ व्यवस्था,अन्नसुरक्षा, जलसंधारण,पर्यावरण विकास,दारिद्र्य निर्मूलन,कृषी व औद्योगिक क्षेत्र विकास,सक्षम व पारदर्शक प्रशासन, ग्रीन एनर्जी विकास इत्यादींच्या माध्यमातून खेडी,शहरे,राज्य व देश समृद्ध बनवणे हा या योजनेचा हेतू आहे.केंद्र सरकारची ही संकल्पना





यशस्वी करण्यासाठी सर्व स्तरावर नियोजन करून त्यानुसार प्रगती कडे वाटचाल करणे यासाठी सामुदायिक प्रयत्नाची आवश्यकता आहे असे ते पुढे म्हणाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित होते. यावेळी कर्नाटका विद्यापीठाचे डॉ.गुरुराज हडळगी,एसएनडीटी विद्यापीठाचे डॉ.सुभाष चव्हाण,डॉ.बी.आर. गायकवाड,डॉ.नितीन दगडे,डॉ.जे.एन. कुलकर्णी,डॉ.जी.डी. सागर,डॉ.व्ही.एम.पवार इत्यादींनी मार्गदर्शन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महा विद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.शिवशंकर घुमरे व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर राष्ट्रीय अधिवेशनास देशभरा तून विविध विद्यापीठे व महाविद्यालयाचे सुमारे ८० पेक्षा अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.

## मेहकरी नदीला महापुर..
## महाभयंकर, महापूर भयावह पूरस्थिती

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील मेहकरी पाणलोट क्षेत्रात हरेवाडी, मराठवाडी, केळ, पिंपळगाव घाट, दौलावडगाव परिसरात पुन्हा शनिवारी दुपारी ढगफुटी झाल्याने दुसऱ्यांदा मेहकरी नदीने रौद्ररुप धारणा केले आहे. महापुर..भयानक, भयवाह परिस्थिती निर्माण झाली आहे.

मेहकरी धरणाच्या सांडव्यावरुन ४ ते ५ फुट उंचीने पाणी वाहत आहे. पूररेषा ओलांडली आहे. मेहकरी नदीच्या काठावरील आनंदवाडी, सराटेवडगाव, रुईनालकोल, नांदा, धीर्डी, शिराळ या गावातील धोका निर्माण झाला आहे. या भागातील



शेतकऱ्यांच्या नदीकाठाच्या जमीनी पिके फळबागा, जनावरे वाहुन गेल्या विहीरी बुजल्या आहेत. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. बळीराजा हवालदिल झाला आहे. शेतकरी आजपर्यंत उन्हाने सुकला. काही दिवस गाळात फसला तर आता पाण्यात वाहून गेला. मेहकरी नदीतून पाणी विसर्ग मोठ्या प्रमाणात होत आहे. नदीची पाणी पातळी जलदगतीने वाढत आहे. पिंपळगाव, मेहकरी, आनंदवाडी, सराटेवडगाव, रूईनालकोल, नांदा,षधिर्डी व शिराळ नदीकाठच्या लोकांना प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा दिला आहे.

दरम्यान आज टाकळी अमिया, सराटेवडगाव, आनंदवाडी, रुईनालकोल पुरग्रस्त भागाचा माजी आ. भीमराव धोंडे यांनी दौरा केला. यावेळी टाकळी अमियाचे सरपंच सावता ससाणे, सराटेवडगावचे सरपंच भीमराव बोडखे, चेअरमन बबन नन्नवरे, उत्तम बोडखे, कचरु भुकन, बाळासाहेब भुकन, रविंद्र भुकन, महादेव नन्नवरे, संजय नालकोल आदि मान्यवर उपस्थित होते.

## महाविकास आघाडीचा शेतकरी बैलगाडी आक्रोश मोर्चा तहसीलवर धडकणार

### मोठ्या संख्येने उपस्थित राहा:- मुळे,जमाले,आंधळे

वडवणी/प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी महाविकास आघाडीच्या वतीने दि.१आक्टोबर २०२५ बुधवार रोजी सकाळी १०वा.वसंतराव नाईक चौकापासून तहसील कार्यालयावर बैलगाडी आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा तालुक्यातील शेतकरी बांधव आपल्या पारंपरिक बैलगाड्यांसह घेऊन तहसील कार्यालयावर धडकणार असून, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी हा लढा उभारला जाणार आहे.तरी सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महादेव जमाले, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांनी केले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक लोकप्रिय खा. बजरंग सोनवणे, राष्ट्रवादीचे माजलगाव मतदार संघाचे नेते मोहन जगताप, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

ओला दुष्काळ जाहीर करावा यासह खालील मागण्या .सरसकट शेतकऱ्यांना कर्जमाफी करा, शेतकऱ्याला सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान जाहीर करा,पाऊसात मुत्यू मुखी पडलेल्या गाय,म्हैस, बैल ५० हजार रुपये मदत करा,शेळी,मेंढी मृत्युमुखी पडलेल्या १५ हजार रुपये मदत करा,खतांवरील जीएसटी रद्द करा,पिएम व सिएम चे वंचित शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावा,पिक विमा तात्काळ देण्यात यावा.यासह अनेक मागण्यासाठी महाविकास आघाडीचा शेतकरी अक्रोश बैलगाडी मोर्चा सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष महादेव जमाले, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे यांनी केले आहे.तहसील कार्यालयासमोर शेतकरी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर करून शासनाला जागे करणार आहेत.

दैनिक जय महाभारत संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com * टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

दैनिक जय महाभारत

# ऊस गाळप हंगामासाठी जवाहर साखर कारखाना सज्ज

## बॉयलर अग्नि प्रदीपन समारंभ संप्पन्न

इचलकरंजी : ( प्रतिनिधी )

हुपरी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या ३३ व्या ऊस गाळप हंगामासाठी संस्थापक चेअरमन कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ संचालक प्रकाश आवाडे व सौ. किशोरी आवाडे आणि संचालक आमदार राहूल आवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत बॉयलर अग्निप्रदीपन संपन्न झाला.




शेतकऱ्यांसाठी कारखान्याच्या विविध योजनांमुळे सन २०२५-२६ या ३३ व्या गाळप हंगामासाठी सुमारे २२ हजार ५५५ हेक्टर ऊस क्षेत्राची नोंद झालेली आहे. या हंगामातील ऊस गाळपासाठी कारखान्याची मशिनरी व सर्व यंत्रणा सज्ज होत आहे. या हंगामातील ऊस तोडणी वाहतूकीसाठी ३४१ ट्रक ट्रॅक्टर, ६२३ अंगद व डंपींग, ३४३ बैलगाड्या आणि ऊस तोडणी ६३ मशिन इतक्या तोडणी वाहतूक यंत्रणेचे करार झालेले आहेत. या हंगामात व्यवस्थापनाने २० लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. तेंव्हा सर्व सभासद व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांनी येणाऱ्या हंगामाकरीता पिकविलेला संपूर्ण ऊस गाळपास पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन ज्येष्ठ संचालक प्रकाश आवाडे यांनी केले.

समारंभास कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासो चौगुले, माजी चेअरमन उत्तम आवाडे, सौ. सपना आवाडे, सौ. मौसमी आवाडे, केन कमिटी चेअरमन दादासो सांगावे, कारखान्याचे संचालक सर्वश्री अभयकुमार काश्मिरे, सूरज बेडगे, आदगोंडा पाटील, शितल आमण्णावर, आण्णासो गोटखिंडे, संजयकुमार कोथळी, गौतम इंगळे, सुनिल पाटील, प्रकाश पाटील, दरगोंडा पाटील, पार्श्वनाथ नारे, प्रशांत कांबळे, सुभाष जाधव, सौ. कमल पाटील, सौ. वंदना कुंभोजे माजी संचालक सुकुमार किणींगे, फैय्याज बागवान, सुमेरू पाटील, जे.जे. पाटील तसेच हुपरीचे आण्णासाहेब शेंडुरे, दिनकर ससे, बाळासाहेब रणदिवे, योगेश कळंत्रे, अमेय जाधव व कार्यकारी संचालक श्री. मनोहर जोशी आणि सर्व अधिकारी उपस्थित होते.



# जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक उल्हास ढेपले यांचा गौरव

फुलंब्री : सुधाकर जेठे

( दै.महाभारत) तालुक्यातील नायगव्हाण जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक उल्हास विठ्ठल ढेपले यांचा ग्रामपंचायत सरपंच जगन्नाथ दाढे यांनी त्यांचा सत्कार करून त्यांचा उत्कृष्ट कामाचा गौरव करण्यात आला त्यांनी अनेक वर्षापासून गावातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी मुलांना केवळ शिक्षणातच नाही तर शिस्त चरित्र आणि सामाजिक मूल्य का मध्ये त्यांच्यामुळे प्रगती केली आहे आणि प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्यासाठी त्यांनी अतूट प्रयत्न केले त्यांच्या कल्पक शिकवण्याच्या पद्धतीमुळे शाळेतील वातावरण अधिक आनंददायी आणि प्रेरणादायी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास त्यांनी निर्माण केला त्यामुळे गावातील नागरिक विद्यार्थी विद्यार्थिनी त्यांच्या बदली सिल्लोड तालुक्यातील पळशी येथे झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये गावकऱ्यांमध्ये नाराजीचे असे वातावरण तयार झाले तरीपण ग्रामपंचायत मार्फत त्यांना पुढील प्रवास सुखकर असो आणि तिथं जाल तिथे ज्ञानाचा प्रकाश सर्वात रहा अशी सरपंचांनी भावना व्यक्त केली



# संबोधी बुद्ध विहार गोरेगाव येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे बारावे पुष्प उत्साहात संपन्न

बोरघर / माणगाव : विश्वास गायकवाड

( दै. महाभारत ) पंचशील बौद्धजन सेवासंघ , बौद्धजन पंचायत समिती गोरेगाव विभाग शाखा क्र ८४१ आणि पंचशील महिला सेवासंघ गोरेगाव विभाग यांनी शनिवार दिनांक २७/९/२०२५ रोजी आयोजित केलेल्या वर्षावास प्रवचन कार्यक्रम मालिकेचे बारावे पुष्प संबोधी बुद्धविहार गोरेगांव या ठिकाणी तुकाराम लोखंडे साहेब यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाले. या वेळी प्रमुख वक्ते पन्हळघर सुपुत्र महावितरण अधिकारी अशोक जाधव यांनी अधर्म आणि सधम्म या विषयावर आपले अभ्यासपुर्ण विचार मांडताना विज्ञानावर आधारीत बौद्ध धम्म नसुन धर्मावर आधारित आजचे विज्ञान आहे असे सविस्तर उदाहरणसह विवेचन करून मनावरील नियंत्रण हेच माणसाच्या वर्तणुकीचे मुळ आहे. मनाची अभिलाषा आणि त्याग यावर मार्गदर्शन करताना धम्म आचरण हि काळाची गरज असून तरूण पिढीने धम्म आणि सधम्म जाणून घेतला पाहिजे. अष्टांग,आर्यसत्य यांचे पालन केले पाहिजे. त्यानंतर बौदउपासक नागाव सुपुत्र आयु. संतोष हाटे यांनी स्वतःच्या घरात कुटुंबा पासून धम्म कसा रुजवला त्याची माहिती सांगता आज त्यांचा चिरंजीव वयाच्या बावीस व्या वर्षी श्रामणेर झाला आहे.

या प्रसंगी पंचशील महिला संघाच्या अध्यक्षा सुप्रियाताई साळवी, सचिव संघमित्रा गायकवाड, रेश्मा साळवी , राखी मोरे, प्रणाली जाधव, पंचशील बौद्धजन सेवासंघाचे सचिव संदिप साळवी सर, शरद मोरे, बळीराम हाटे, हिरामण महाडिक ,सुरेश जाधव, श्रीकांत साळवी, सुरेश अहिरे देवळी,सम्यक साळवी उपस्थित होते. राजू मोरे सर यांनी २२ प्रतिज्ञा देऊन मला मिळालेला उत्कृष्ट शिक्षक सन्मान हा कुशल कर्माच फळ आहे नियमित वर्षावास प्रवचन कार्यक्रमाच्या मालिकेतून धम्म समजून घेताना आपले काम कुशल आणि प्रामाणिक कसे होईल हे शिकायला मिळाल अस मत व्यक्त केले.


# स्वच्छ माहूर सुंदर साठी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा पुढाकार

## स्वच्छता कर्मचाऱ्यांना टीशर्ट व अप्रॉन वाटप

दररोज सकाळी स्वतः हजर राहून नगराध्यक्ष करून घेत आहेत स्वच्छता

माहूर : ( प्रतिनिधी )

नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर माहूर नगरीत भाविकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ होत असताना, नगर पंचायतीने स्वच्छतेला विशेष प्राधान्य दिले आहे. स्वच्छ माहूर, सुंदर माहूर ही संकल्पना साकार करण्यासाठी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी स्वतः दररोज सकाळी संध्याकाळी हजर राहून स्वच्छता मोहिमेत सहभागी होत शासनाचा उपक्रम शंभर टक्के यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत



शनिवारी, रविवारी आणि ललित पंचमीच्या दिवशी भाविकांचे प्रचंड आगमन होत असल्याने मंदिर परिसर, महामार्ग व टी-पॉईंट या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगराध्यक्ष दोसानी यांनी कर्मचाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून झाडू हातात घेत स्वच्छतेचा संदेश दिला.या वेळी १०० रोजंदारी स्वच्छता कर्मचाऱ्यांना टीशर्ट तर ३० महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांना अप्रॉन वाटप करण्यात आले. या छोट्याशा पण महत्त्वपूर्ण कृतीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाची नवी ऊर्जा संचारल्याने गडासह शहर स्वच्छ दिसत आहे

भाविकांच्या सेवेसाठी दिवसरात्र राबणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या कष्टाचे कौतुक करत नगराध्यक्ष दोसानी म्हणाले की, स्वच्छता ही केवळ जबाबदारी नाही तर आपली संस्कृती आणि श्रद्धेचा भाग आहे. भाविकांना निर्मळ, सुंदर माहूर अनुभवायला मिळावा, हीच आमची ध्येयवेड आहे.नगर पंचायतीच्या या उपक्रमामुळे माहूर नगरीत स्वच्छतेबाबत नवा आदर्श प्रस्थापित झाला असल्याचे मत मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी व्यक्त केले आहे.या वेळी उपनगराध्यक्ष नाना लाड,सभापती विजय कामटकर ,नगरसेवक प्रतिनिधी सुमित खडसे,रफिक सौदागर,इरफान सय्यद,रणधीर पाटील, निसार कुरेशी,राजू सौंदलकर, विक्रम राठोड यांची उपस्थिती होती. भाविक व नागरिकांकडून या कार्याचे भरभरून कौतुक होत आहे.

# ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढून शिक्षकाचा सत्कार

संतोष गंधे यांना राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार मिळाल्याने गोंडवाडी गावात उत्साहाचे वातावरण

माहूर : (प्रतिनिधी )

माहूर तालुक्यातील गोंडवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे सहशिक्षक संतोष शेषराव गंधे यांना शैक्षणिक क्षेत्रातील महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार मिळाल्याने गोंडवाडी गावाचे समस्त गावकरी व शालेय व्यवस्थापन समिती यांनी सत्कार सोहळा आयोजित करून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकी द्वारे गावात हृदय सत्कार केला



यावेळी गावातील सरपंच,उपसरपंच, व्यवस्थापन समिती, सहकारी शिक्षक,ज्येष्ठ नागरिक, पालक व विद्यार्थ्यांनी मनोगत मांडतानागुरु म्हणजे समाजाच्या भवितव्याचा शिल्पकार,ज्ञानदीप प्रज्वलित ठेवणारा तेजस्वी दीपस्तंभअशी उपाधी गंधे सरांना दिली.सत्कारानंतर संतोष गंधे यांनी सांगितले की,विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच माझा ध्यास आहे.गावकऱ्यांचे सहकार्य आणि मुलांचे प्रेम हेच माझे खरे बळ आहे. हा पुरस्कार माझा नसून संपूर्ण गावाचा आहे. असे सांगितले

शिक्षणावर श्रद्धा, परिश्रमांवर विश्वास आणि विद्यार्थ्यांवर प्रेम यामुळेच संतोष गंधे सरांचा प्रवास आज राज्यपातळीवर दखलपात्र ठरल्याने त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला त्यामुळे गोंडवाडी गावासह माहूर तालुका शिक्षण विभागाच्या मनात शिरपेचाचा तुरा रोवला गेला आहे यावेळी प्रकाश बावणे वाघमारे सर संदिप तोडसाम संजय सिद्धेवार रूपाली बावणे विष्णु बावणे विमलबाई पुरके विनोद बावणे निलेश कातले राजु मेश्राम जंगोबाई तोडसाम अनुपमा मेश्राम मनोज मेश्राम कल्पना पुरके लैलाबाई तोडसाम मिनाबाई मेश्राम अश्विनी कातले दिपाली बावणे यांचे सह गावकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# दिवस उसंत घेतलेल्या पावसाने कन्नड येथे पावसाचा कहर


## मुंडवाडी सह अनेक गावाचा संपर्क तुटला होता

कन्नड : निलेश पवार

( दै. महाभारत )

पुन्हा धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. शनिवार रात्रीपासून जोरदार सुरु असलेल्या पावसाने जिल्ह्यातील १८ मंडलांत शनिवारी सकाळपर्यंत झालेल्या २४ तासांत अतिवृष्टीची नोंद झाली. जिल्ह्यातील सर्व प्रकल्प ओसंडून वाहत आहेत. नदी-नाल्यांना महापूर आला आहे. अनेक धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडले आहे. त्यामुळे पाण्याचा प्रवाह पात्र सोडून शेत शिवारातून वाहत आहे. अनेक रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे अनेक ठिकाणचे मार्ग रहदारीसाठी बंद करण्यात आले आहेत. सीना कोळेगाव प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात सीना नदीत पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे नदी काठच्या नागरिकांना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे

कन्नड तालुयातील मुंडवाडी येथे शिवना नदी महा रुद्र रूप माय वास मिळाली तसेच संपर्क तुटला असता



जवळपास नऊ तास गावाचा रस्ता बंद होता मुरुड येथील नवीन पदाचे काम अपूर्ण असल्यामुळे गावाचे मनोगत नाराज होत आहेत महिला मंडळीनी देवी ला साकडे घातले आहेत आम्हा गावाला पाण्यापासून वाचव आसे साकडे घातले आहेत



कुडूत्री : (प्रतिनिधी)

राधानगरी अंबाबाई नवरात्र उत्सव व संयोजन कमिटीच्या वतीने घेण्यात आलेल्या झिम्मा फुगडी स्पर्धेत ( सन २०२५) धुंदवडेच्या मोरजाई गटाने प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेचा अन्य निकाल असा द्वितीय क्रमांक धनलक्ष्मी गट (पंडेवाडी) नागनाथ गट(सोनाळी),तृतीय रासाई गट (असंडोली),चतुर्थ हनुमान तालीम (शिरगाव)स्पर्धेत एकूण नऊ संघांनी सहभाग घेतला.विजेत्यांना ६००१,४००१,२००१,५०१ रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले.

स्पर्धेचे परीक्षण पत्रकार मधुकर किरुळकर व पत्रकार सुभाष चौगले यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राधानगरीचे माजी उपसरपंच सौ अरुणा पोवार, अरविंद पोवार,सौ श्वेता पोवार, सौ कल्पना पोवार, सौ.मनीषा आंग्रे, सौ.मनीषा खोत, सौ.वर्षा खोत, सौ.सिमा पोवार, सौ.शिवानी आंग्रे,संगीता पोवार,आयोजक रमेश पोवार,उमेश पोवार,सागर पोवार, पत्रकार मिलिंद कांबळे,,स्वप्नील कांबळे,दीपक सुतार,ज्ञानेश्वर आंग्रे,कोंडीबा टिपूगडे,आदींनी परिश्रम घेतले.

# वरून राजा कोपल्याने भोकर तालुक्यातील शेतकरी मजूरदार म्हणतात जगावकी मरावं –शेतकरयांचा फुटला टाहो

## सरकार मात्र आलिशान गाडीमध्ये बसून शेतकऱ्यांना तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याच काम करत आहे

भोकर : अनिल डोईफोडे

( दै.महाभारत )

संपूर्ण राज्यात पावसाने हाकार माजलेल्या शेतकरी मात्र रस्त्यावर आल्याचे चित्र निर्माण झाले आहे अनेक पिके उध्वस्त झाल्याने शेतकरी मात्र हवालदिल झाला शेतकरी जगला तर देश जगेल असं म्हणलं जातं जगाचा पोशिंदा जगला नसेल तर जनता कशी जगेल असं चित्र निर्माण झाली आहे अशा भयानक ढगफुटीमुळे सर्व पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासन मात्र मोठमोठे खोटे आश्वासन देऊन शेतकऱ्यांना सोपवण्याचे काम करत आहे मात्र शेतकरी राजा सरकारच्या मदतीकडे हात पसरून बसला आहे शेतकऱ्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाचा प्रश्न मूलभूत सुविधांचा प्रश्न हा अत्यंत गंभीर झाला असून प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष दिल का असे सर्व समाज माध्यमांमध्ये चर्चा ऐकावयास मिळत आहे पूर परिस्थिती पाहणी दौरे करण्यात मंत्री संत्री आमदार खासदार मग्न असून झालेल्या नुकसानीची पाहणी करत असताना अनेक ठिकाणी मुश्किल हास्य करून सेल्फी काढण्यात मग्न झाले आहेत ही एक खेदाची बाब आहे प्रशासनाच्या या निर्लज्जपणाचा सर्व शेतकरी मात्र अत्यंत दुःख



व्यक्त करीत आहे जणू काय शेतकऱ्याच्या दुःखावर मीठ चोळण्याचे काम या सरकार करीत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे ही गंभीर बाब असल्याचे शेतकरी वर्गातून बोलल्या जात आहे प्रशासन भोकर तालुक्यातील झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानेकडे गंभीर पणे लक्ष देईल का? याकडे शेतकरी राज्याचे लक्ष लागून आहे

दैनिक जय महाभारत

# युवा मराठा महासंघाची सर्व सामान्यांच्या न्याय हक्कासाठी दमदार व लढाऊ कर्तबगारी!!

निफाड : रामभाऊ आवारे
(दै . महाभारत)

मित्रांनो, सर्व हितचिंतकांना सस्नेह जय जिजाऊ जय शिवराय! मी राजेंद्र पाटील राऊत संस्थापक युवा मराठा महासंघ सांगु इच्छितो की, आपणा सगळ्यांच्या साक्षीने सन २०२१ साली युवा मराठा महासंघ या सामाजिक संघटनेची स्थापना करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श विचारसरणीला अनुसरून अठरा पगड जाती व बारा बलुतेदार असलेल्या सगळ्या जाती धर्मातील सर्वसामान्य, गोरगरीबांच्या हक्कासाठी व न्यायासाठी महासंघाचे ध्येय व धोरणे ठरवली.महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी, अठरा पगड जातीच्या विकासासाठी! हे ब्रीदवाक्य महासंघाचे सामाजिक चळवळीतील कार्य वाढविण्यासाठी व नवचैतन्य निर्माण करून जागृतीची क्रांतिकारी चळवळ उभीं करण्यासाठी सोबत घेऊन आज सन २०२१ पासून महासंघाने विविध विषयांवर संघर्ष करुन आंदोलने केलीत व त्यात चांगल्या प्रकारे यश देखील प्राप्त झाले.महासंघाने सटाणा तालुक्यातील ताहराबाद वनविभागाच्या कार्यालयावर आंदोलन छेडून मांगीतुंगी भिलवाड गावातील आदिवासी बांधवांना न्याय मिळवून दिला हे महासंघाला मिळालेले सगळयात मोठे यश होतं, हे येथे अभिमानाने सांगावेसे वाटते.त्यानंतर रोझे ता.मालेगाव येथील अकार्यक्षम ग्रामसेवक बदली संदर्भात आंदोलन करून बदली केली.मालेगाव तालुक्यातील व-हाणे येथील प्रश्नावर सतत पाच वर्षे महासंघाचे आंदोलन सुरू आहे.तर येवला तालुक्यातील पुरणगाव ग्रामपंचायतीचा राजकारण करणारा कर्मचारी संतोष संपतं ठोंबरे यास सेवेतून बडतर्फ करण्याच्या मागणीसाठी केलेले आंदोलन सुध्दा व्यशस्वी झाले आणि शेवटी चौकशी समिती स्थापन करून महासंघाने त्या




तालुक्यात सुध्दा दमदार कामगिरी करून दाखवली.त्याशिवाय महासंघाने चांदवड तालुक्यातील कळमदरे गावात अवैध रितीने शासकीय गौण खनिजाची बेकायदेशीर सुरू असलेली चोरटी वाहतूक बंद पाडून शासनाच्या तिजोरीत लाखो रुपयांचा महसूल जमा करण्यास भाग पाडले.तसेच मालेगाव तालुक्यातील माल्हणगाव येथेही एका महिलेला विना दलाल व विना पैशाने अंगणवाडीच्या नोकरीत लावून देण्याचे पुण्यकर्म युवा मराठा महासंघाच्या माध्यमातून आम्ही करू शकलो. तसेच नगाव ता. मालेगाव येथील अन्यायग्रस्त बागुल कुटूंबाला न्याय मिळवून देण्याचे भाग्य युवा मराठा महासंघाला लाभले.एवढेच नव्हे तर युवा मराठा महासंघाच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील वानखेड गाव व परिसरात आमचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वप्नील बापू देशमुख यांनी स्वखर्चाने त्या भागात पुरात अडकलेल्या गोरगरीब बांधवांना किराणा मालाच्या किट्स वाटप करून सामाजिक चळवळीत महासंघाचे योगदान काय आहे हे दाखवून दिले.त्या पलिकडे जाऊन महासंघाचे कार्य हे संपूर्ण महाराष्ट्रात सुरूच आहे.सांगायचे तात्पर्य एवढेच की, हे सगळं आपल्या समोर मांडून आम्ही आमचा गुणगौरव सांगत आहोत अशातला भाग हा मुळीच नाही.पण युवा मराठा महासंघाच्या माध्यमातून कार्य करताना आम्ही कधी कुणाला आमचा शत्रू अथवा दुश्मन मानलेच नाही, फक्त जेथे जेथे अन्याय दिसला तेथे तेथे महासंघ उभा राहिला अगदी न्याय मिळेपर्यंत लढत राहिला.तरीही आमच्या बाबत गैरसमज पसरविणे,बदनाम्या करणे, प्रसंगी आम्ही सुरू केलेली ही लोकचळवळ कुठे तरी बंद व्हावी म्हणून आमच्यावर हल्ले करण्यासारखे गंभीर प्रकार सुध्दा घडले मात्र आम्ही न डगमगता या सगळ्या गोष्टींना आपला शुभ व गोड आशिर्वाद समजून अधिकच जोमाने कार्यरत झालोत.युवा मराठा महासंघाच्या वतीने मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की, जेथे जेथे न्यायाची आवश्यकता आहे.गोरगरीबांचा आवाज दडपला जाऊन ते अन्याय अत्याचाराचे शिकार ठरत आहेत.तेथे सदैव युवा मराठा महासंघ आपल्या सोबत आहे,ते सुद्धा अगदी न्याय मिळेपर्यंत! एव्हढेच यानिमित्ताने...

राजेंद्र पाटील राऊत
संस्थापक अध्यक्ष युवा मराठा महासंघ महाराष्ट्र
संस्थापक अध्यक्ष आश्रय आशा फाऊंडेशन व-हाणे, संस्थापक अध्यक्ष लोकहित माहिती अधिकार पत्रकार व पोलीस संरक्षण संघटना महाराष्ट्र.

## गोदाकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे माजी जि प सदस्य मा श्री सुरेश हात्ते

तलवाडा : आर आर बहिर..
( दै. महाभारत )

जायकवाडी धरणातून तब्बल दोन लाख क्युसेक्स पेक्षा अधिक पाणी गोदावरी नदीत सोडण्यात आले आहे. त्यामुळे सध्या गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असून परिसरात महापूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.अशी माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश रावजी हात्ते साहेब यांनी गोदाकाठच्या मिरगाव,पांढरी ,राहेरी,बोरगाव,गगावाडी,काठोडा,या गावांमध्ये जाऊन नागरिकांना सतर्क राहण्याचे आव्हान माजी जि प सदस्य सुरेश हात्ते साहेब यांनी केले आहे शेतामध्ये अक्षरशा पिकांची नासाडी झाली हातातोंडाशी आलेला घास या निसर्गाने हेरून घेतला म्हणून शेतकऱ्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू आहे तरी विद्यमान सरकारनी तातडीची मदत करावी असे हात्ते साहेब यांनी म्हटले आहे यावेळी राहेरी गावचे सरपंच नागरिक मा श्री लाड साहेब पत्रकार आर आर आबा कृष्णा कावळे तलवाडा ग्रामपंचायत माजी सदस्य संतोष हातागळे नागरिक युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## उत्सव साजरा करतांना समाजहिताचे कार्यक्रम राबवा : प्रांत अधिकारी पर्वणी पाटील



ब्रह्मपुरी :( प्रतिनिधी )

आज समाजात अनेक लोक दुःखी, नैराश्यग्रस्त आहे त्यांना धीर देणे तसेच सद्या अनेक संकटाचा सामना शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्यांना करावा लागत आहे त्यांची त्यातून त्यांची सुटका करने ही आपली नैतिक जबादारी आहे, म्हणूनच सण, उत्सवा दरम्यान सामाजिक उपक्रम राबवावे असे मत प्रांत अधिकारी पर्वणी पाटील यांनी व्यक्त केले.

दुर्गा उत्सवादरम्यान दानधर्म करणे, महिला सक्षमीकरणावर भर देणे आणि पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम राबवणे यांसारख्या समाजोपयोगी कामांचे आयोजन करणे आवश्यक आहे. अनेक समित्या दानधर्मासह उत्सव आयोजित करतात. महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यासाठी हे व्यासपीठ वापरले जाते. दान धर्माच्या माध्यमातून गरजूंना मदत करणे, पर्यावरण पूरक उपक्रम राबवणे आणि समाजात सकारात्मक बदल घडवणे यांसारख्या गोष्टी उत्सवात असायला हव्या.

ब्रह्मपुरी तालुक्यातील सर्व मंडळ हे नेहमीच समाजपयोगी उपक्रम राबवित असते, त्यांचे कार्याचे प्रांत अधिकारी यांनी यावेळी कौतुक केले आहे.सण उत्सव ठरवून दिलेल्या नियम अटी अंतर्गत आनंदाने साजरे करून सर्व मंडळाने एक आदर्श निर्माण करावा असे आवाहन प्रांत अधिकारी पर्वणी पाटील यांनी केले आहे.

# भर पावसात जीव मुठीत घेऊन धरताय शिक्षणाची वाट, सोयगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी फरफट


## लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा जीवाशी खेळ

सोयगाव :- संदीप इंगळे
(दै. महाभारत)

सोयगाव दि. २७ (प्रतिनिधी) वरसाडा येथील शाळा सुटताच वरसाडा, कवली आणि बहुलखेडा परिसरात शनिवारी दुपारी विजेच्या कडकडाटासह सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे तब्बल शेकडो विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन पायी घरी परतण्याचा धक्कादायक प्रकार घडला. ही घटना उघडकीस आल्यानंतर तालुक्यात संतापाची लाट उसळली असून, लोकप्रतिनिधींच्या बेफिकिरीबद्दल नागरिक आक्रोश व्यक्त करीत आहेत.

बससेवे अभावी दररोजचा पायी प्रवास. बहुलखेडा आणि कवली (ता. सोयगाव) येथील जवळपास १०० हून अधिक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना गावात माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसल्याने वरसाडा (ता. पाचोरा) येथे शिक्षणासाठी जावे लागते. परंतु, शाळेच्या वेळेवर बससेवेचा अभाव असल्याने या विद्यार्थ्यांच्या नशिबी रोज सकाळ -संध्याकाळ सहा किलोमीटरचा पायी प्रवास आलेला आहे. चिखल तुडवीत, डोंगर-ओढे पार करीत, जीव मुठीत घेऊन विद्यार्थी शाळेत जातात व परततात.

शनिवारी उघडकीस आलेला प्रकार.शनिवारी दुपारी शाळा सुटताच विजेच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस सुरू झाला. त्यावेळी वरसाड्यातून कवली व बहुलखेड्याकडे परतणाऱ्या विद्यार्थ्यांना पावसात भिजत, विजेच्या कडकडाटात जीव धोक्यात घालून पायी प्रवास करावा लागला. पालकांची चिंता अधिक वाढवणारा हा प्रकार नागरिकांसाठीही धक्कादायक ठरला.



शैक्षणिक हक्क धोक्यात

मोलमजुरी करणाऱ्या पालकांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे या ध्येयाने पालक त्यांना शाळेत पाठवतात. मात्र शासन व लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित व सुलभ प्रवासाऐवजी जीव धोक्यात घालून पायी चालत शिक्षण घ्यावे लागत आहे. पावसाळ्यात ओढे, नाले, चिखल व पावसाचा धोका अधिक वाढल्याने या लहानग्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

गैरसोयींवर कोणीच लक्ष देत नाही.

सोयगाव तालुक्यात शिक्षण व दळणवळण क्षेत्रात गंभीर गैरसोयी आहेत. शाळेच्या वेळेनुसार बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी वारंवार मागणी होत असली तरी संबंधित प्रशासन वा लोकप्रतिनिधींकडून ठोस पावले उचलली जात नाहीत. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजचा पायी प्रवास टाळता येत नाही.

नागरिकांचा संताप.

आमच्या मुलांच्या सुरक्षिततेकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे. शाळेच्या वेळेवर बससेवा उपलब्ध करून दिली नाही, तर कोणत्याही अपघातास शासन व लोकप्रतिनिधी जबाबदार राहतील, असा इशारा पालक व ग्रामस्थांनी दिला आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शालेय बससेवा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी आता प्रखर होत आहे.

# मंद्रूळ कोळे ता.पाटण येथे राष्ट्रीय पोषण माह उत्साहात साजरा

पाटण : सागर पाटील

( दै. महाभारत ) महिला आणि बालकांच्या आरोग्यासाठी केंद्र सरकारने आयोजित केलेल्या ८ व्या राष्ट्रीय पोषण माह २०२५ चा शुभारंभ १७ सप्टेंबर पासून झाला आहे. १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हा अभियान देशभरात राबवला जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्य प्रदेशातील धार येथे 'स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान' सोबत या ८व्या राष्ट्रीय पोषण माहची सुरुवात केली, जो त्यांच्या सशक्त नारी आणि सुपोषित भारत या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

पोषण माहचे प्रमुख उद्देश आणि थीम (विषय): यंदाचा राष्ट्रीय पोषण माह पोषण साक्षरता वाढवण्यासाठी आणि निरोगी सवयींना




प्रोत्साहन देण्यासाठी जनआंदोलन पुढे घेऊन जात आहे. या वर्षाच्या अभियानाचे मुख्य विषय कुपोषण दूर करणे आणि शाश्वत आरोग्याला चालना देणे हे आहेत,मंद्रुळकोळे ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी २५ सप्टेंबर २०२५ रोजी पोशन माह आयोजित केला. यामध्ये प्रामुख्याने परसबाग, पुर्व प्राथमिक शिक्षण, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, लाडकी बहिण योजना, आरंभ, आकार ढक्क, पौष्टिक आहार प्रदर्शन, स्वस्थ नारी सशक्त परीवर यांचे फिल्प चार्ट च्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात आले तसेच यामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमाची मांडणी मंद्रूळकोळे ग्रामपंचायत अंतर्गत



## होत्याच नव्हत झाल साऱ्या शेताला नदीच रूप आलं

नायगाव : बालाजी शेवाळे
( दै. महाभारत )

बरबडा सर्कल व नायगाव तालुक्यांमध्ये गंभिर पुर परिस्थिती निर्माण झालेली आहे बरबडा,वजीरगाव,पाटोदा,मनुर, ईज्जतगाव,कहाळा,,टाकळी,आंतरगाव आदी गावामध्ये २००६ ची पुरपरिस्थिती होण्याच्या मार्गावर आहे, शेतीचे,घरांचे व ईतर अनेक नुकसान होत आहे, पृशासनाने याकडे लक्ष देऊन शेतकर्यांना तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत करावी, काही ठिकाणी विधुत पुरवठा खंडीत आहे,अशा अनेक समश्यानी नागरीक हतबल झालेला आहे, पाटोदा गावाला सहाव्यांदा पुराचा विळखा पूर्णपणे जनजीवन विस्कळीत, पाणी प्रचंड वेगाने वाढत आहे; तरीपण प्रशासनाद्वारे काहीही मदत नाही पूर्ण गावाच्या भोवताल पाणी आहे.



## बाधीत शेतकर्यांना ओला दुष्काळ जाहीर करुन मदत द्यावी-भागवत एखंडे

जालना : ( प्रतिनिधी )

जालना तालुक्यातील सोमनाथ जळगाव परिसरातील झालेल्या पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. रजोरदार पावसामुळे शेतात सर्वत्र पाणीच पाणी दिसून आले. अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली गेली.सतत पडणाऱ्या पावसामुळे ओढे आणि नाले तुडुंब भरून वाहू लागले.गावातील तसेच शिवारातील शेतजमिनी पाण्याखाली गेल्याने कपाशी, सोयाबीन, मका, उडीद यासह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तरीही शासनाने कागदी घोडे न नाचवता शासनाने सरसकट पंचनामे करून तात्काळ मदत द्यावी अशी मागणी सोमनाथ जळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते भागवत एखंडे यांनी केली आहे.सोमनाथ जळगाव परिसरात झालेल्या जोरदार पावसाने शेती पिकांना मोठा फटका बसला आहे. अगोदर झालेल्या पावसामुळे शेतात पाणी साचले होते. पावसामुळे शेतात पाणीच पाणी साचले आहे. पावसाचा मारा इतका तीव्र होता की शेतकऱ्यांनी उभ्या पिकांवर केलेला मेहनतीचा घाम काही तासांत वाहून गेला. शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे पिके कुजण्याची भीती व्यक्त होत आहे. कपाशी आणि सोयाबीनच्या शेतात सध्या हिरवळ पसरलेली असली तरी त्यावर पाण्याचे थैमान असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. परिसरातील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने सरसकट पंचनामे करण्याची मागणी केली आहे.यामुळे शेतकरी वर्गात चिंता आणि नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. सरकारने तात्काळ परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी सोमनाथ जळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते भागवत एखंडे यांनी केली आहे.

### बेधडक

### लहरीपणा....!

माणसांसारखा निसर्गही हल्ली
भलताच लहरी झाला आहे,
कधी पूर तर कधी वादळाने त्याने
कित्येकांचा संसार जहरी केला
आहे...!

असा लहरीपणा दाखवून
त्याने जहर पसरू नये,
लहरीपणा करताना त्याने
शेतकऱ्यांचे कष्ट विसरू नये...!!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४